दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३०२ शनिवार दि.११ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-302 Saturday, Dt.11 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


# जनआरोग्य योजनेतील गैरव्यवहारांवर सरकारचा 'एसआयटी'चा दणका..?

## गरीबांच्या आरोग्य निधीवर दरोडा टाकणाऱ्यांना सोडणार नाही - मुख्यमंत्री

बीड । प्रतिनिधी

**महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहारांवर राज्य सरकारने कठोर भूमिका घेत विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्याची घोषणा करत दोषींवर कठोर कारवाईचा इशारा दिला.**

दरम्यान, नाशिकप्रमाणेच बीड जिल्ह्यातही या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आरोप सातत्याने होत असून, शासनाने या प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी केल्यास मोठे आर्थिक घोटाळे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विधिमंडळात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जनआरोग्य योजनांच्या आढावा बैठकीत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार डॉ. राहुल आहेर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, २०२४ ते २०२६ या कालावधीत राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या तपासणीत सुमारे १६ हजार संशयित दावे व शस्त्रक्रियांची नोंद आढळली असून त्यापैकी ९,५०० प्रकरणे नाशिक जिल्ह्यातील




## नाशिकप्रमाणेच बीडमध्येही मोठा घोटाळा उघड होण्याची शक्यता, उच्चस्तरीय चौकशीची गरज..!

आहेत. या प्रकरणात नाशिकमधील पाच रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात येणार आहे. चौकशी अहवालानंतर दोषींवर कठोर कारवाईसह अपहार झालेल्या निधीची वसुली केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्र्यांनी जनआरोग्य योजनांमधील पारदर्शकता वाढविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता , डेटा ॲनालिटिक्स, सायबर तपास आणि फॉरेन्सिक ऑडिट यांचा व्यापक वापर करण्यात येणार असल्याचे सांगितले.

संशयास्पद सुमारे १३ लाख संभाव्य फसवणूक प्रकरणांची अत्याधुनिक प्रणालीद्वारे छाननी केली जाणार असून, प्रत्येक जिल्ह्यात समर्पित फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा उभारण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

मुख्यमंत्री म्हणाले, गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार व पारदर्शक आरोग्य सेवा देणे ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. जनआरोग्य योजनांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही.

### नाशिकनंतर बीडचा क्रमांक...?

नाशिक जिल्ह्यातील कथित गैरव्यवहारामुळे राज्य सरकारला एसआयटी स्थापन करण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्याच धर्तीवर बीड जिल्ह्यातही महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आरोप विविध स्तरांवर होत आहेत. या आरोपांची अधिकृतरीत्या अद्याप पुष्टी झालेली नाही; मात्र शासनाने स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी केल्यास वस्तुस्थिती समोर येऊ शकते, अशी मागणी आता जोर धरत आहे. संबंधित प्रकरणात चौकशी झाल्यास नेमके कोण जबाबदार आहेत आणि शासनाच्या निधीचा अपहार झाला आहे का, याचे सत्य समोर येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पत्रकारांना परवानगी देऊन नगरपरिषद सभा लाईव्ह दाखवा-खुर्शीद आलम

बीड(प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाच्या वतीने बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे मॅडम यांना निवेदन देण्यात आले यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब भाई उपस्थित होते, नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी साहेब यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की देशातील सर्वोच्च सभा म्हणजेच संसद भवन सभा व राज्यसभा आणि विधानपरिषद सभेचे श्रळींश प्रसारण केले जाते आहे, अगदी याच पार्श्र्वभूमीवर बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा बीड शहरातील नागरिकांसाठी श्रळींश दाखवण्यात यावी

पान २ वर...



नगराध्यक्ष व मुख्याधिकारीकडे तुतारी गटाची मागणी

# ऊसाच्या शेतात फुलला गांजाचा मळा,चकलांबा पोलिसांचा धडक छापा

## २५३ गांजाची झाडे उद्धस्त,तब्बल ४८.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त, एकावर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत चकलांबा पोलिसांनी मोठी कारवाई करत गेवराई तालुक्यातील सुरळेगाव शिवारातील ऊसाच्या शेतात करण्यात आलेली गांजाची लागवड उद्ध्वस्त केली. या कारवाईत २५३ गांजाची झाडे, सुका व निमसुका गांजा असा एकूण ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, चकलांबा पोलीस स्टेशनच्या पथकाने सुरळेगाव



शिवारातील गट क्रमांक ११३ मधील ऊसाच्या शेतावर छापा टाकला. तपासणीदरम्यान ऊसामध्ये लपवून ठेवलेली गांजाची २५३ लहान-मोठी झाडे आढळून आली. या झाडांचे एकूण वजन १८४.४ किलो असून त्यांची अंदाजे किंमत ४६ लाख १० हजार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याशिवाय, कारवाईत ४ किलो ३०० ग्रॅम सुका गांजा (किंमत अंदाजे

पान २ वर...


### जाहीर प्रगटन

श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट ता.जि.बीड नोंदणी क्र. ई.०२ (बीड) या संस्थेचे अध्यक्ष श्री आर. एच. भोसले यांनी संस्थेच्या घटनेतील नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर दि. २७.०६.२०२६ रोजी विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस सर्व सभासदांना देऊन त्या नोटीसनुसार दि. १२.०७.२०२६ रोजी श्री बंकटस्वामी विद्यालय, खडकी घाट ता. जि. बीड या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री आर. एच. भोसले हे वयोवृद्ध असल्यामुळे व त्यांची तब्येत बरोबर नसल्यामुळे ते संस्थेच्या कामकाजासाठी वेळ देऊ शकत नाहीत. म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव घेऊन संस्थेचे संपूर्ण कामकाज पाहण्याचे अध्यक्ष यांचे संपूर्ण अधिकार संस्थेचे उपाध्यक्ष यांना देण्यात आले असल्यामुळे, संस्थेचे अध्यक्ष यांनी दि. २७.०६.२०२६ रोजी काढण्यात आलेली नोटीस ही संपूर्णपणे घटनाविरोधी व बेकायदेशीर आहे.

संस्थेच्या कामकाजासंदर्भात संस्थेच्या कायदेशीर सचिव यांनी वरीलप्रमाणे दि. २७.०६.२०२६ रोजी कोणतीही सभेची नोटीस काढलेली नाही.

दि. २७.०६.२०२६ रोजीच्या सभेच्या नोटीसमधील जे विषय नमूद केलेले आहेत, त्या नोटीसनुसार दि.१२.०७.२०२६ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात येणारे कोणतेही निर्णय संस्थेचे सभासद, संस्था संचलित शाखेचे शाखाप्रमुख, व कर्मचारी यांच्यावरती बंधनकारक राहणार नाहीत. या सभेमध्ये घेण्यात येणारे निर्णय हे मुळातच कायदेशीर राहणार नाहीत, म्हणून या सभेचा संस्थेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन

सौ. सरोज गोपाळराव सोंडगे
सचिव
श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट
ता.जि. बीड

सचिव
श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था,
खडकी(घाट),ता.जि.बीड.


# सुभाष रोड होणार आता संत मुक्ताई मार्ग..!

## संत-महंतांच्या उपस्थितीत शनिवारी नामफलकाचे अनावरण



बीड नगर परिषदेचा ऐतिहासिक निर्णय

बीड /प्रतिनिधी

आदिशक्ति संत मुक्ताई यांचे आजोबा ब्र. गोविंदपंत ज्या मार्गावर समाधिस्त आहेत, ज्या मार्गावर संत मुक्ताईची पालखी बीड शहरात दोन दिवस मुक्कामी राहत बीडकरांना दर्शन देते त्या मार्गाला 'संत मुक्ताई मार्ग' असे नाव देण्याचा निर्णय बीड नगर परिषेदेने घेतला असून यास विविध सामाजिक संघटना व सर्वपक्षीय सहमती दिली आहे. बीड शहरात संत मुक्ताई यांच्या पालखीच्या आगमन दिवशी नामफलकाचे अनावरण संत महंत व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असल्याचे बीड नगर पालिकेने कळविण्यात आले आहे.

'संत मुक्ताई मार्ग' नामकरण सोहळा आ. विजयसिंह पंडित यांच्या अध्ययक्षतेखाली दिनांक ११ जुलै रोजी ११ वाजता पार पडणार असून यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पालिका पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

बीड शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या दरम्यान मार्गास आदिशक्ती संत मुक्ताई महाराज यांच्या नावाच्या नामफलकाचे अनावरण होणार आहे.

पान २ वर...

### आळंदी देवस्थानाकडून अभिनंदन

संत ज्ञानेश्वर यांची समाधी असलेल्या देवाची आळंदी कडून घेतलेल्या ठराव बद्दल बीड नगर पालिकेचे अभिनंदन लेखी स्वरूपात केले आहे . आ विजयसिंह पंडित व नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांचा उल्लेख करून संस्थान कडून बीड करांचे अभिनंदन करण्यात आले आहे.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत..

# 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर

मुंबई प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'प्रीमियर शो ' झाला.

या ' प्रीमियर शो'साठी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी,



सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले,उपसंचालक वर्षा आंधळे, आदी उपस्थित होते.

संपादकीय....

# शहर आपले, जबाबदारीही आपलीच

शहराचा विकास हा एकतर्फी प्रयत्नांनी होत नाही. प्रशासनाची कार्यक्षमता, लोकप्रतिनिधींची बांधिलकी आणि नागरिकांची जबाबदारी या तीनही घटकांचा समन्वय असेल, तरच स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि सक्षम शहराची निर्मिती होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक समस्येसाठी दोषारोप करण्यापेक्षा 'माझे शहर, माझी जबाबदारी' ही भावना प्रत्येक नागरिकाने स्वीकारणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

पावसाळा सुरू झाला की शहरांतील अनेक समस्या पुन्हा एकदा समोर येतात. मुसळधार पाऊस, तुंबलेले रस्ते, चोकअप झालेली गटारे आणि नाले, वाहतुकीचा खोळंबा, कचऱ्याचे ढीग, दूषित पाणी आणि विस्कळीत नागरी सुविधा अशा अनेक अडचणी नागरिकांना दरवर्षी भेडसावतात. अशा वेळी प्रशासन, महानगरपालिका किंवा लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उठते. ही टीका काही अंशी योग्यही असते, कारण नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची आहे. मात्र प्रत्येक समस्येचे संपूर्ण खापर केवळ प्रशासनावर फोडून चालणार नाही. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही तितकीच आहे. शहराच्या विकासाचा विचार केला, तर प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक हे एका त्रिकोणाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. यापैकी एक घटक निष्क्रिय राहिला, तर विकासाचा समतोल बिघडतो. प्रशासन नियोजन करते, निधी उपलब्ध करून देते, रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधा पुरवते. लोकप्रतिनिधी नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवतात, विकासकामांवर पाठपुरावा करतात आणि लोकांच्या अपेक्षा शासनापुढे मांडतात. पण या दोघांच्या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो.

पावसाळ्यात पाणी तुंबण्याची, गटारे-नाले चोकअप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे गटारामध्ये अडकलेला कचरा. मुळातच गटारे ही घरातील पाणी, सांडपाणी वाहून जाण्याचे कार्य करत असतात. पण नागरिक याचे भान न ठेवता गटारांमध्ये, नाल्यांमध्ये घरातील लहान-मोठे अडगळीचे साहित्यही फेकून देत असतात. त्यावेळी हे सामन गटारातून वाहून जाणे शक्य नसल्याचे भानही त्यांना राहत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. काही अंतरावर हे साहित्य वाहून गेल्यावर पुढे अडकते व पाणी तुंबण्याची प्रक्रिया सुरू होते आणि खापर मात्र त्या त्या महापालिका प्रशासनावर व स्थानिक लोकप्रतिनिधींवर फोडले जाते.

पान १ वरुन..

**ऊसाच्या शेतात...**

२ लाख ६ हजार ४००) तसेच ४५० ग्रॅम निमसुका गांजा (किंमत अंदाजे ११ हजार २५०) जप्त करण्यात आला. अशा प्रकारे एकूण ४८ लाख २७ हजार ६५० किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.

या प्रकरणी मनोज ऊर्फ बादल भगवान आंधळे (वय ३६), रा. नगद नारायण वस्ती, सुरळेगाव, ता. गेवराई याच्याविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कोंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश कन्हाडकर, सहाय्यक फौजदार सोमनाथ कुलकर्णी, पोलीस हवालदार विश्वनाथ प्रधान, नरेंद्र बांगर तसेच हनुमान इंगोले, संदीप गायकवाड आणि प्रशांत घोंगडे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

नागरिकांना पोलिसांचे आवाहन

अमली पदार्थांची लागवड, साठवणूक, विक्री किंवा वाहतुकीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या ९२७०२४३२०० या क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन बीड जिल्हा पोलिसांनी केले आहे.

**पत्रकारांना परवानगी....**

म्हणजे बीड नगरपरिषद शहराच्या विकासासाठी आणि सर्वसामान नागरिकांसाठी नगरपरिषद काय निर्णय घेत आहेत आणि कोण कोणत्या योजना राबवत आहेत वगैरे याची माहिती सर्वसामान्य लोकांना मिळू शकेल, नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा श्रळींश दाखवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रेस मिडिया, सोशल मिडिया वगैरे यांना नगरपरिषद सभागृहात बसण्याची परवानगी देऊन त्यांना सभागृहात बसण्याची जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी तुतारी गटाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे, या शिष्टमंडळात नगरसेवक अशोक काळे, नगरसेवक अय्युब खान पठाण, नगरसेवक अक्षय जाधव, नगरसेवक मसी भाई, नगरसेवक मोहसीन भाई, नगरसेवक रईस भाई आदी मान्यवर उपस्थित होते,

म्हणजे बीड नगरपरिषद शहराच्या विकासासाठी आणि सर्वसामान नागरिकांसाठी नगरपरिषद काय निर्णय घेत आहेत आणि कोण कोणत्या योजना राबवत आहेत वगैरे याची माहिती सर्वसामान्य लोकांना मिळू शकेल, नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा श्रळींश दाखवण्यासाठी

पान १ वरुन..

इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रेस मिडिया, सोशल मिडिया वगैरे यांना नगरपरिषद सभागृहात बसण्याची परवानगी देऊन त्यांना सभागृहात बसण्याची जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी तुतारी गटाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे,

**सुभाष रोड होणार....**

हा नामफलकाचा अनावरण सोहळा ह.भ.प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज महंत, श्री क्षेत्र नारायणगड, संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे अध्यक्ष रविंद्र महाराज पाटील, लक्ष्मण महाराज मेंगडे, गोरक्षनाथ टेकडीचे नवनाथ महाराज, चाकरवाडीचे महादेव महाराज, रामगडाचे स्वामी योगीराज महाराज, भवानीगडचे अखंडानंद गिरी महाराज, नवगण राजुरीचे अमृत महाराज जोशी, बेलेश्वर संस्थानचे भारती महाराज, महादेव महाराज राऊत जवळेकर, विनायक महाराज पाटांगणकर, अतुल महाराज शास्त्री, लक्ष्मण महाराज फड, हरिदासभाऊ जोगदंड यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आ. विजयसिंह पंडित राहणार आहेत.

शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल जगताप, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, संपादक शेख मुजीब, मा.अध्यक्ष मराठवाडा चेम्बर्स अँड कॉमर्सचे सत्यनारायण लाहोटी, शिवसेना जिल्हा प्रमुख स्वप्नील गलधर, जिल्हा प्रमुख शिवसेना सचिन मुळूक, व्यापारी महासंघ कॅटचे संतोष सोहनी यांच्यासह आदी मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम, गटनेते फारूक पटेल, स्थायी समिती सदस्य अमर नाईकवाडे, सभापती संजय उडाण, सभापती श्रीमती मोमीन सीमा परवीन, सभापती गुंजाळ धर्मराज लक्ष्मण, सभापती श्रीमती आरती रंजित बनसोडे, बीड शहर व्यापारी महासंघ कॅटचे अध्यक्ष विनोद पिंगळे, सुभाष रोड व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष निलेश ललवाणी यांच्यासह संत मुक्ताई मार्ग व्यापारी असोसिएशन, संत मुक्ताई नामकरण समिती, वारकरी सांप्रदाय, बीड यांनी केले आहे.

नारायण गडाने दिला कौल

आध्यत्मिक संदर्भ आणि वर्तमान लोकभावनां लक्षात घेऊन नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांनी व उत्तर अधिकारी संभाजी महाराज यांनी स्वाक्षरी सह अभिप्राय देताना संत मुक्ताईचे नाव मार्गास देणे संयुक्तिक असल्याचे लेखी म्हटले आहे .

व्यापारी बांधवाकडून स्वागत

सुभाष रोड असोशियसन यांनी लेखी पत्र देऊन संत मुक्ताईचे नाव देण्यास हरकत नसल्याचे कळवत ठरावाचे स्वागत केले .संतोष सोहनी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या व्यापारी महासंघाने मागणीचे स्वागत केले.

खास नागरिकांसाठी वॉर्ड क्रमांक २५ मध्ये 'एसआयआर मॅपिंग'

# नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे विशेष आयोजन - अ‍ॅड.गोविंद शिराळे पाटील



बीड /प्रतिनिधी

लोकशाही बळकट करण्यासाठी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. हीच बाब लक्षात घेऊन बीड शहरातील वॉर्ड क्रमांक २५ मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे विशेष आयोजन युवा नेते नगरसेवक अ‍ॅड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय, ओम नमो सदन, जिजाऊ नगर, रेणू हॉस्पिटल समोर, बार्शी रोड बीड या ठिकाणी बीड येथे शनिवार दि. ११ व रविवार १२ जुलै ठिक सकाळी ११.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत करण्यात आले आहे. वॉर्डातील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबियांसह या शिबिराला उपस्थित राहून आपली नोंदणी पूर्ण करावी, असे जाहीर आवाहन भाजपा नगरसेवक नगरसेवक अ‍ॅड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांनी केले आहे.

बीड शहरातील वॉर्ड क्रमांक २५ मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. वॉर्डातील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबियांसह या शिबिराला उपस्थित राहून आपली नोंदणी पूर्ण करावी, नागरिकांच्या सुविधेसाठी आणि ही प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी शिबिरस्थळी अधिकृत बीएलओ (एसआयआर) अधिकारी आणि बूथस्तरीय कार्यकर्ते पूर्ण वेळ उपलब्ध राहणार आहेत. नागरिकांनी आपल्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे (उदा. आधार कार्ड, जुने ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा) सोबत आणावीत, जेणेकरून जागेवरच पडताळणी व नोंदणीची प्रक्रिया विनाअडचण पूर्ण करता येईल. वॉर्डातील जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभघ्यावा आणि राष्ट्रीय कर्तव्यात आपले योगदान द्यावे, आवाहन भाजपा नगरसेवक नगरसेवक अ‍ॅड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांनी केले आहे.




## लातूरच्या संजिवनी नागमोडे यांना राज्य शासनाचा 'जिजामाता कृषिभूषण पुरस्कार' प्रदान!

लातूर /प्रतिनिधी

पारंपरिक शेतीला आधुनिकता, सेंद्रिय पद्धती आणि पूरक व्यवसायांची जोड देऊन शेतीत क्रांती घडवणाऱ्या लातूर जिल्ह्यातील चिंचोलीराववाडी येथील प्रयोगशील महिला शेतकरी संजिवनी अंगद नागमोडे यांना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते राज्य शासनाच्या कृषी विभागाचा 'जिजामाता कृषिभूषण पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात आला.नुकतेच वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे झालेल्या या कृषि पुरस्कार सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री अ‍ॅड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४२७/२०२६**
**आशाबाई भ्र. बप्पासाहेब माने व इतर वि. निरंक**
**मार्फत - अ‍ॅड. आर आर अंबट गेवराई**

अर्जदार

१. आशाबाई भ्र. बप्पासाहेब माने वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. टाकळगव्हाण ता. गेवराई जि. बीड

२. हनुमान पि. बप्पासाहेब माने वय ३६ वर्षे, धंदा - नोकरी रा. सदर

३. कृष्णा पि. बप्पासाहेब माने वय ३२ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर

ज्याअर्थी मयत बप्पासाहेब पि. नारायण माने रा. टाकळगव्हाण ता. गेवराई जि. बीड हे/हया अनुक्रमे दिनांक २६/०८/२०२४ रोजी रा. टाकळगव्हाण, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बप्पासाहेब पि. नारायण माने रा. टाकळगव्हाण ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०७/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहिर प्रगटन**
**मा. श्री. एम. पी.मर्ढेकर, ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०६९/२०२६**
**मुक्ताराम रांजवण व इतर वि. निरंक**
**अ‍ॅड. योगेश टेकाडे यांच्या मार्फत**

ज्यापेक्षा राघु चुडामण रांजवण, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड हे दिनांक १३.०६.२०२५ रोजी राहत्या घरी मयत झालेले आहेत.

१.मुक्ताराम राघु रांजवण, वय-६४ वर्षे, धंदा-शेती,
२.मारोती राघु रांजवण, वय-६२ वर्षे, धंदा - शेती,
३.पांडुरंग राघु रांजवण, वय-४८ वर्षे, धंदा-शेती,
४.छायाबाई निवृत्ती रांजवण, वय-५६ वर्षे, धंदा-घरकाम,
५.नितीन निवृत्ती रांजवण, वय - ३९वर्षे, धंदा-शेती,
६.सुशेण निवृत्ती रांजवण, वय-२५ वर्षे, धंदा-शेती,
७.हौसाबाई सखाराम थोरात, वय-४८ वर्षे, धंदा-घरकाम,
८.सिताबाई तुळसीराम रोहिटे, वय-४६, धंदा-घरकाम, अर्जदार नं. १ ते ८ रा. आहेर वडगाव, ता.जि. बीड.
९.लताबाई सुभाष शेंडगे, वय-४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. तिप्पटवाडी, ता.जि. बीड

अर्जदारांची मागणी -बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ च्या कलम २ प्रमाणे नुसार वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणेबाबत..

अर्जदार क १ ते ३ हे मयत राघू चुडामण रांजवण यांची मुले आहेत. अर्जदार कं.४ हि मयताचा मुलगा निवृत्ती राघु जाधव याची पत्नी आहे व अर्जदार कं.५ ते ६ हे तिचे मुले आहेत. तसेच अर्जदार कं. ७ ते ९ या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी देवईबाई हि दिनांक १५.०३.२००३ रोजी मयत झालेली आहे. वरील अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात त्यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत राघु चुडामण रांजवण यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २९/०८/२०२६ आहे.

आज दिनांक १० जुलै २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर, बीड

शिक्का

आदेशावरून,
स्वाक्षरित/-
अधिक्षक दिवाणी न्यायालय
व.स्तर, बीड

**:: जाहिर प्रगटन ::**
**मा.श्री.रिजवान उ.शेख ४ थे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. १०५२/२०२६**
**अ‍ॅड. योगेश एस. टेकाडे**
**सुंदरराव व ईतर वि. निरंक**

ज्यापेक्षा, गिन्यानदेव काशिनाथ शिंदे, हे दिनांक १६/०८/२०२० रोजी, आहेर वडगाव, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत, तसेच

अर्जदार १. सुंदरराव पि. गिग्यानदेव शिंदे, वय ७२ वर्षे, धंदा. शेती, रा. आहेर वडगाव, ता.जि. बीड २. सगनराव पि. गिन्यानदेव शिंदे, वय. ७० वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे ३. केरनाथ पि. गिन्यानदेव शिंदे, वय. ६८ वर्षे, शेती, रा. वरीलप्रमाणे अर्जदार क. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. मयताची पत्नी मयत झालेल्या आहेत.

असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कांत मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे काणोस समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हा कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोट, सदरहु अर्जदारांच्या हक्कांतबददल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा/अर्जदारांच्या हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे गिन्यानदेव काशिनाथ शिंदे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख : १४/०८/२०२६ ही आहे.

आज दिनांक १० जुलै २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर, बीड

शिक्का

आदेशावरून,
स्वाक्षरित/-
अधिक्षक दिवाणी न्यायालय
व.स्तर, बीड

**दिवाणी किरकोळ अर्ज :- १०५०/२०२६**
**जयश्री परशुराम आगाम वि. निरंक**
**विधीज्ञ जरांगे प्रतिभा एन.**
**जाहीरनामा**
**मा. श्रीमती एस. डी. सोनी २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**
**मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार

१. जयश्री भ्र. परशुराम आगाम, वय ४२ वर्षे, धंदा-घरकाम,

२. परशुराम पि. वैजीनाथ आगाम, वय ५३ वर्षे, धंदा-शेती, दोघे रा. पिंपरगव्हाण, ता. जि.बीड.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सुरज पि. परशुराम आगाम याचा दिनांक ०८/०४/२०२६ रोजी जिवन अमृत हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाला आहे. अर्जदार क. १ ही मयताची आई असून, अर्जदार कं २ हे मयताचे वडील आहे. मयत सुरज हा अविवाहीत होता. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे सुरज पि. परशुराम आगाम, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत सुरज पि. परशुराम आगाम, याचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १४.०८.२०२६ आहे.

आज दिनांक ०८.०७.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर, बीड

शिक्का

आदेशावरून,
स्वाक्षरित/-
अधिक्षक दिवाणी न्यायालय
व.स्तर, बीड

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३७५/२०२६**
गणेश बाहेती - निरंक
**(मार्फत-अ‍ॅड.एल.जी.कुलकर्णी)**

ज्याअर्थी मयत नामे **बसंताबाई भ्र.शिवनारायण झंवर हे दि.०८.०२.२०२६ हे रोजी मौजे सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.गणेश पि.बालाप्रसाद बाहेती, वय-२९ वर्षे, धंदा-नौकरी, रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बसंताबाई भ्र.शिवनारायण झंवर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -१८/०८/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

## जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार रमेश शंकर राठोड, रा.हरीलाल नाईक तांडा, रा.केकतपांगरी ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचा मुलगा **आरव रमेश राठोड** यांचा जन्म दि.२२.०५.२०२४ रोजी **हरीलाल नाईक तांडा केकत पांगरी** येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडून अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, हरीलाल नाईक तांडा केकत पांगरी ता.गेवराई जि.बीड** येथे नोंद घेणे राहुन गेलेले आहे. अर्जदारास शासकीय जन्म नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता जन्माचा अर्ज मंजुर करुन सदरील जन्मधारकाचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, हरीलाल नाईक तांडा केकत पांगरी ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता जन्माबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**



# अपघाताची वाट न पाहता रस्ता सुरक्षित करा

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नागरिकांची मागणी

पात्रुड-जीवनापूर मार्गावरील साईड पट्ट्या तातडीने भरण्यासाठी निवेदन; पावसाळ्यात वाढला अपघाताचा धोका

माजलगाव । प्रतिनिधी

पात्रुड-जीवनापूर मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना साईड पट्ट्या न भरल्याने वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यामुळे अपघात होण्यापूर्वीच संबंधित रस्ता सुरक्षित करण्यासाठी तातडीने साईड पट्ट्या भराव्यात, अशी मागणी नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भराव नसल्याने रस्ता आणि बाजूच्या जमिनीमध्ये उंचीचा मोठा फरक निर्माण झाला आहे. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला गेल्यास चालकांचे नियंत्रण सुटण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः पावसाळ्यात चिखल आणि निसरड्या परिस्थितीमुळे दुचाकी वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत असून, चारचाकी वाहनांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, रुग्णवाहिका तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना तातडीने साईड पट्ट्या भरून मार्ग सुरक्षित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

सत्यप्रेम कोरडे, चिंतामणी कोळसे, हनुमान कोरडे, रंगनाथ सागर आणि रोहन डाके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात घडणाऱ्या अपघातांची जबाबदारी संबंधित विभागाची राहील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

# 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'चा बीडमध्ये जागर

# पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## महामानव अभिवादन ग्रुप व 'वाचाल तर वाचाल' वाचनालयातर्फे पी.ई.एस.च्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव, 'पे बॅक टू सोसायटी'चा निर्धार

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटी (पी.ई.एस.)च्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप आणि 'वाचाल तर वाचाल' वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पी.ई.एस.च्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला तसेच समाजासाठी 'पे बॅक टू सोसायटी' या संकल्पनेवर भर देण्यात आला.

तुलशी संगणक व माहितीशास्त्र महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. उत्तम साळवे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून निर्भय, विवेकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा नागरिक घडविण्याच्या उद्देशाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी. एम. भोले यांनी केले. पुढील वर्षापासून पी.ई.एस.च्या माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणून शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सेवानिवृत्त कार्यकारी अधिकारी पी. व्ही. बनसोडे, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, प्रभारी माहिती अधिकारी मिलिंद तूपसमुद्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली.

या प्रसंगी प्रा. प्रदीप रोडे आणि ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच पी.ई.एस.च्या विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनाही सन्मानित करण्यात आले.

'वाचाल तर वाचाल' वाचनालयाच्या वतीने सम्यक संबुद्ध विहार, नागोबा गल्ली येथे वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी ८१ पुस्तकांचा संच मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना प्रा. प्रदीप रोडे यांनी समाजहितासाठी माजी विद्यार्थ्यांनी संघटित होऊन विधायक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. तर सुभाष साळवे आणि पी. व्ही. बनसोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समाजजीवनात सातत्याने प्रसार करण्याची गरज अधोरेखित केली.

दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी महामानव अभिवादन ग्रुप व 'वाचाल तर वाचाल'च्या सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांना वृत्तपत्राच्या माध्यमातून सातत्याने पाठबळ देण्याची ग्वाही दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. एम. राऊत यांनी केले, तर प्रशांत वासनिक यांनी आभार मानले. शेवटी थायलंड येथे अपघातात निधन झालेल्या नऊ बौद्ध भिक्खूंना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, माजी विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमास कॅप्टन राजाभाऊ आठवले , अशोक ठोकळ, पी आय साबळे,भास्करराव सरपते, प्रशांत वासनिक, अँड. तेजस वडमारे, अँड.राजेश शिंदे प्रा.राम गायकवाड, रघुनाथ शेवाळे कल्याण भंडारे, उमाजी आठवले, राहुल जाधव, कुमारथ पारवे, अंकुश कोरडे, सुनील डोंगरे, प्रा. घाडगे, राजेंद्र भोले, गंगाधरे, मंदाताई मस्के,वैशाली शिंदे, शोभा आठवले, पंचशीला सरपते, डी.जी. तांदळे, मुक्त पत्रकार युसुफभाई, अरविंद डोळस, कचरू भोले, प्रा. शिवाजी दिवाण, पांडुरंग घोडेराव यांची उपस्थिती होती.तर यशवंत वासनीक, हॅपी वासनिक, बी.जी. दळवी, बि.डी. तांगडे यांनी कार्यक्रम यशस्वीते करिता बहुमोल परिश्रम केले.



### पी.ई.एस.च्या माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

यावेळी एस.एस.सोनवणे, डी.जी. वानखेडे , दशरथ मकासरे, ए.बी.जौजाळ, के.बी.गायकवाड, प्रा. वसंत ओगले, शिवाजीराव वावळकर, प्रकाश शिंदे सखाराम उजगरे, उमाजी वाघमारे प्रा.डॉ. आत्माराम झिंजुर्डे, अँड.डी.एम. विद्यागर, अँड.एस.एम. साळवे, वंदनाताई वाघमारे, मोहन गवई, प्रवीण टाकणखार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ना. पंकजाताई मुंडेंनी घेतली उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट



## बीड जिल्हयातील विविध विकासाच्या मुद्द्यावर चर्चा, परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमिपूजनाचेही दिले निमंत्रण

मुंबई /प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन बीड जिल्हयाच्या विविध विकास प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली. परळी येथे होणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमिपूजनाचे निमंत्रण त्यांनी यावेळी सुनेत्राताईंना दिले.ना. पंकजाताई मुंडे यांनी देवगिरी बंगल्यावर उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेतली. या प्रसंगी बीड जिल्ह्याच्या विविध विकासकामांच्या संदर्भात त्यांच्याशी अतिशय सकारात्मक चर्चा झाली.या भेटी दरम्यान, परळी वैजनाथ येथे नव्यानेच होत असलेल्या 'पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या' भूमिपूजन सोहळ्याचे आग्रहाचे निमंत्रणही त्यांनी सुनेत्राताईंना दिले. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी आणि लोककल्याणाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास ना.पंकजाताईंनी यावेळी व्यक्त केला.

# शेतात उतरले सीईओ जितिन रहमान, तिफणीवर पेरणी करत शेतकरी प्रशिक्षण केंद्राची पाहणी

बीड /प्रतिनिधी

शेती आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी शुक्रवारी (दि. १०) तालुक्यातील लोळदगाव येथील बळीराजा कृषी विज्ञान मंडळ संचलित शेतकरी प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन तेथील विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष शेतात उतरून तिफणीवर पेरणी करत शेतीकामाचा अनुभव घेतला.

भेटीदरम्यान सीईओ जितिन रहमान यांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्र परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच केंद्रात राबविण्यात येणाऱ्या कृषी प्रशिक्षण, आधुनिक शेती पद्धती आणि शेतकरी मार्गदर्शन उपक्रमांची माहिती घेत त्यांनी केंद्राच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी अशा प्रशिक्षण केंद्रांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.



यावेळी कृषी अधिकारी अनिरुद्ध सानप, कृषीतज्ज्ञ शिवराम घोडके, लोळदगावचे सरपंच, प्रशिक्षण केंद्राचे संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

शेती विकासासाठी प्रत्यक्ष शेतात उतरून पेरणी करणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# गेवराई पोलिसांची अवैध वाळू माफियांवर मध्यरात्री धडक

## तब्बल ९.०६ लाखांचा मुद्देमाल केला जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलाकडून अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीविरोधात मध्यरात्री धडक कारवाई करत अशोक लिलँड कंपनीचा 'बडा दोस्त' पिकअप जप्त केला. या कारवाईत वाहनासह एकूण ९ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या निर्देशानुसार गेवराई पोलीस ठाण्याच्या पथकाने १० जुलै २०२६ रोजी शहर व परिसरात विशेष गस्त घालून अवैध वाळू वाहतुकीवर लक्ष ठेवले होते.

यावेळी रात्री सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर-



कोल्हेर रोडवर विनानोंदणी क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा अशोक लिलँड 'बडा दोस्त' पिकअप संशयास्पदरीत्या येताना आढळून आला. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये विनापरवाना गौण खनिज (वाळू) वाहतूक केली जात असल्याचे निष्पन्न झाले. संबंधित वाहनातून अवैधरित्या वाळूची वाहतूक करून तिची विक्री करण्याच्या उद्देशाने नेली जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

पोलिसांनी वाहनासह चालकाला ताब्यात घेत ९,०६,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र आत्माराम ओव्हाळ (बकल क्र. २११२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ४१९/२०२६ दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) अन्वये पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक अतुलकुमार लांडगे, सहायक पोलीस निरीक्षक समाधान दौड, पोलीस हवालदार कल्याण राठोड, पोलीस कॉन्स्टेबल गोरक्ष डोके व जितेंद्र ओव्हाळ यांनी सक्रिय सहभाग घेतला.

अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधातील मोहीम यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असून, अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा गेवराई पोलिसांनी दिला आहे.

# २४० उसतोड मजुरांच्या हाती नोंदणी कार्डे

## वाढदिवसानिमित्त उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचा सामाजिक उपक्रम

माजलगाव /प्रतिनिधी :

वाढदिवसाचे औचित्य साधत सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच अनिलराधे कांबळे यांनी उसतोड मजुरांसाठी राबविलेल्या उपक्रमातून २४० नोंदणीकृत मजुरांना लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाकडून प्राप्त झालेल्या नोंदणी कार्डांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे उसतोड मजुरांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे.

अनिलराधे कांबळे यांच्या पुढाकारातून त्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष विभागाच्या वतीने लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाकडे यापूर्वी उसतोड मजुरांची नोंदणी करण्यात आली होती. त्या नोंदणीच्या आधारे महामंडळाकडून २४० नोंदणी कार्डे उपलब्ध झाली असून ती संबंधित



लाभार्थ्यांच्या हाती सुपूर्द करण्यात आली. नोंदणी कार्ड मिळाल्याने मजुरांना विविध शासकीय सुविधा, आर्थिक सहाय्य व इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार असल्याने मजुरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी अनिलराधे कांबळे यांनी उसतोड मजुरांच्या हक्कांसाठी व त्यांच्या कल्याणासाठी भविष्यातही अशा लोकहिताच्या उपक्रमांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. उपस्थित लाभार्थींनी या उपक्रमाचे स्वागत करत त्यांचे आभार व्यक्त केले.

# रुग्ण मदतीचा 'धस पॅटर्न' कायम

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पाठपुराव्याला यश; विविध ठिकाणच्या गरजू रुग्णांना दिलासा

## तीन- दिवसात सात रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून लाखोंची मदत

पाटोदा । प्रतिनिधी

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेंतर्गत मागील तीन दिवसात विविध भागांतील सात गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मंजूर झाली. या मदतीमुळे अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून, गरजू रुग्णांसाठी राबविण्यात येणारा 'धस पॅटर्न' पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून पिंपळवंडी (ता. पाटोदा) येथील अपघातग्रस्त अभिमन्यू आनंदा जरे यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपये मंजूर झाले. या मदतीमुळे त्यांच्यावर यशस्वी उपचार होऊ शकले. तसेच हुसेन कुरेशी यांच्या अवघ्या पाच दिवसांच्या बाळाच्या उपचारांसाठी ५० हजार रुपये मंजूर झाले असून, सध्या त्या बाळावर परभणी येथे उपचार सुरू आहेत.

याचबरोबर सावित्रीबाई कराडकर (रा. वाघे बाबुळगाव, ता. केज) यांच्या उपचारांसाठी ५५ हजार रुपये, तर शेख शफिक शेख इब्राहिम (रा. बीड) यांच्या उपचारांसाठी ६५ हजार रुपये मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मंजूर झाले.

या सर्व प्रकरणांमध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करून पाठपुरावा करण्याची जबाबदारी सहाय्यक ड. महेश बेदरे यांनी पार पाडली. तसेच आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी आवश्यक ते सहकार्य केले, तर मुंबई येथे प्रक्रिया गतिमान करण्यासाठी विनोद वाघ यांनी विशेष पुढाकार घेतला.याशिवाय तुषार कोंडे (रा. पिंपरी) यांना ५० हजार रुपये, अरणव हिंगे (रा. शिरूर, ता. शिरूर) यांना ७० हजार रुपये, तसेच संतोष नवनाथ लगड (रा. मांडवा) यांना विशेष बाब म्हणून ५० हजार रुपये मंजूर करण्यात यश आले या प्रकरणांमध्ये कागदपत्रे प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अमर वाळके यांनी पुढाकार घेतला व सहकार्य केले.



गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेवर आर्थिक मदत मिळावी, यासाठी आमदार सुरेश आण्णा धस सातत्याने प्रयत्नशील असून, त्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा लाभ मोठ्या प्रमाणावर गरजूंपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे रुग्ण मदतीचा धस पॅटर्न हा सर्वत्र चर्चेचा विषय ठरत असून, अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण बनत आहे.

# महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानांच्या वेतनवाढीचा प्रश्न ऐरणीवर

## आमदार रोहित पवारांनी व्यवस्थापकीय संचालकांची घेतली भेट

मस्साजोग /प्रतिनिधी

महाराष्ट्र सुरक्षा बल मधील जवानांच्या प्रलंबित मागण्यांसह वेतनवाढ, प्रशिक्षण आणि कंत्राटी सेवाकाला संदर्भातील प्रश्नांवर आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सचिन पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. तसेच या मागण्यांबाबतचे निवेदन ही त्यांनी अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले असून, येत्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा विषय प्राधान्याने घेण्याची त्यांनी विनंती केली आहे.

निवेदनात कोणत्या मागण्या. ?

रोहित पवार यांनी दिलेल्या निवेदनात महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे.सध्या महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानांना दरमहा सुमारे २८ हजार रुपये मानधन निश्चित करण्यात आले आहे.परंतु जवानांच्या खात्यामध्ये १९ ते २० हजार रुपये मानधन दिले जाते. मात्र मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये वाढत्या महागाईमुळे हे मानधन अपुरे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

अनेक जवान अनेक वर्षे सेवा बजावत असतानाही त्यांची ११ महिन्यांच्या कंत्राटी पद्धतीने वारंवार नियुक्ती केली जाते. त्यामुळे कायमस्वरूपी सेवेसंदर्भात निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानांना केवळ ४५ दिवसांचे प्राथमिक प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये अग्निशमन, प्रथमोपचार आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण समाविष्ट करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

जवानांच्या प्रलंबित वेतनवाढीचा प्रश्न तातडीने निकाली काढावा, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

राज्यभर महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र सुरक्षा बलाची स्थापना २०१० मध्ये करण्यात आली असून केंद्र व राज्य शासनाच्या विविध कार्यालयांपासून सार्वजनिक तसेच काही खासगी संस्थांमध्ये सुरक्षा पुरविण्याचे काम हे जवान करतात. महत्त्वाच्या ठिकाणी जबाबदारीने सेवा बजावणाऱ्या जवानांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार योग्य वेतन, प्रशिक्षण आणि सेवा सुरक्षितता मिळावी, अशी भूमिका रोहित पवार यांनी मांडली



आहे.सकारात्मक निर्णयाची अपेक्षा

या सर्व मागण्यांवर येत्या बोर्ड बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी विनंती आमदार रोहित पवार यांनी व्यवस्थापकीय संचालकांकडे केली आहे. यावर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिल्याची माहितीही त्यांनी दिली. त्यामुळे महाराष्ट्र सुरक्षा बलातील हजारो जवानांच्या वेतनवाढी आणि इतर प्रलंबित मागण्यांबाबत लवकरच महत्त्वाचा निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुदतीपूर्वीच १०० टक्के काम पूर्ण

## तीन बीएलओंचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव



बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत मुदतीपूर्वीच १०० टक्के काम पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्ह्यातील तीन मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते अभिनंदन प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या १४ मे २०२६ च्या निर्देशानुसार राज्यभर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदारांच्या घरोघरी जाऊन गणना अर्जांचे वितरण व संकलन करण्याचा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत बीड जिल्ह्यातील बीएलओंनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक मतदारापर्यंत प्रत्यक्ष पोहोचून गणना अर्जांचे वितरण केले. तसेच आयोगाच्या 'एउखछएढ' प्रणालीमध्ये बीएलओ पच्या माध्यमातून अर्जांचे डिजिटल वितरण व स्वीकृतीची प्रक्रिया शंभर टक्के पूर्ण केली.विशेष बाब म्हणजे, २९ जुलैपर्यंत पूर्ण करावयाचे काम संबंधित बीएलओंनी १० जुलै रोजीच यशस्वीरीत्या पूर्ण करून कार्यतत्परतेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या प्रामाणिकपणा, जबाबदारीची जाणीव आणि कार्यक्षमतेमुळे निवडणूक प्रक्रियेला मोठी गती मिळाल्याचे सांगत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. भविष्यातही याच समर्पणाने काम करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मधुकर विश्वानाथ वाघ - सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बंदेवाडी (ता. केज), यादी भाग क्र. ८०, केज विधानसभा मतदारसंघ.

रामेश्वर भिमराव सुंबे - सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोखंडवाडी (ता. आष्टी), यादी भाग क्र. ८८, आष्टी विधानसभा मतदारसंघ.

प्रसिद्धीपत्रकात तिसऱ्या क्रमांकावरही रामेश्वर भिमराव सुंबे यांचेच नाव नमूद आहे. संबंधित यादीत मुद्रणदोष असण्याची शक्यता आहे.दरम्यान, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यातील सर्व मतदारांना आवाहन करताना सांगितले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत आपल्या भागातील बीएलओकडून गणना अर्ज घेऊन तो अचूक भरून द्यावा. मतदार यादी अद्ययावत आणि अचूक करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे सहकार्य अत्यावश्यक असून हा उपक्रम विहित मुदतीत यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

# मुलींना पालकांनी संपूर्ण शिक्षण घेऊ द्यावे - तहसीलदार सुरेखा स्वामी

धर्माबाद / अशोक पडोळे

शहरातील हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद येथे आज फेब्रुवारी मार्च २०२६ रोजी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विश्वनाथ पाटील बनाळीकर, प्रमुख पाहुणे तहसीलदार सुरेखा स्वामी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, पत्रकार जी पी मिसाळे , संपादक शिवराज गाडीवान, माजी विद्यार्थी शिवकुमार पाटील, गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संगीत संचाने हुतात्मा पानसरे गीताने करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन सौ बोटलावार व आभार उदयकुमार सोवळे यांनी केले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच १९८८ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. शालांत प्रमाणपत्र परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम आणली पूनम जाधव, कृष्णा देगावे धनश्री कदम मनमत कावडे या सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व समृद्धी चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



हुतात्मा पानसरे हायस्कूल देणारी गुणवंत विद्यार्थी कु.पुनम जाधव सत्कार करताना तहसीलदार सुरेखा स्वामी, मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री व सौ सरोज विश्वनाथ पाटील

तहसीलदार सुरेखा स्वामी म्हणाले पालकांनी मुलींना संपूर्ण शिक्षण घेऊ द्यावे माझे आई-वडील शेतकरी आहेत खुर्चीवर बसलेले वेगळे नाहीत ही पालकांनी मुलींना उच्च शिक्षित करावे स्पर्धा परीक्षा क्लासेस लावावे व मुलींना शिक्षण घेऊ द्यावे असे आवाहन करण्यात आले. मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात चांगली स्वप्न बघा त्याच्यामागे धावा यश तुमच्या हातात आहे त्यासाठी शालेय जीवनात आनंद मिळवत निकाल प्रगतीचा आलेख चढता क्रमांकावर ठेवा तुम्हाला बक्षीस मिळतील तेव्हा तुमच्या पालकांचा सत्कार होईल त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या घरचा टीव्ही बंद ठेवावा तुमचा खरा त्याग आहे गुणवंत विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात अभ्यासाबरोबर कला क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवावे प्रगतीचे पुस्तक शाळेतच वाचली जाते म्हणून विद्यार्थ्यांनी चांगली स्वप्न बघा त्याच्यामागे धावा यश तुमच्या हातात आहे असे आवाहन करण्यात आले.

# तिरुपती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे हृदयरोग, मधुमेह विभागाची सुरुवात..!

## प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ ओमप्रकाश बादाडे असतील उपलब्ध

बीड /प्रतिनिधी

बीड शहरामध्ये नगर नाका परिसरातील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ तथा मनकाविकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे आता मेडिसिन विभागही सुरू होत आहे. जिल्ह्यातील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ तथा मेंदू विकार तज्ञ

डॉ ओमप्रकाश यशवंतराव बादाडे (चइइड,ऊछइ ऋएछएठ-ड चएऊखउखछए)हे तिरुपती हॉस्पिटल येथे सदैव उपलब्ध असणार आहेत.

रविवार २ ऑगस्ट २०२६ या दिवशी या मेडिसिन विभागाचे उद्घाटन होऊन अधिकृतपणे सुरुवात होणार आहे. तरीही जिल्ह्यातील, शहरातील हृदयरोग ,मधुमेह, मेंदू विकार ,दमा ,विषबाधा ,सर्पदंश जळीत रुग्ण, इत्यादी मेडिसिन विभागाच्या आजारासाठी रुग्णांनी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड येथे ७७७०००३२२९ या दूरध्वनीवर संपर्क साधून गरजू रुग्णांनी उपचार घ्यावेत असे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल च्या वतीने प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ ओमप्रकाश बादाडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.तसेच हाडाच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी महात्मा ज्योतिराव फुले योजना अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया उपचार मार्गदर्शन केले जात आहे. तरीही गरजू रुग्णांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा. अस्थिरोग विभाग,हृदयरोग मधुमेह विभाग, कान नाक घसा विभाग या सर्व आजारावर लागू असलेल्या मोफत शस्त्रक्रियेच्या योजना द्वारे उपचार केले जातात. गरजू




रुग्णांनी याचा अवश्य लाभ घेण्याचे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल च्या वतीने डॉ बालाजी नवले यांनी केले आहे.

# 'कलान्तर २०२६' कला महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन

धुळे (जिमाका वृत्तसेवा)

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने कलान्तर आर्ट फाउंडेशनतर्फे आयोजित 'कलान्तर २०२६' या वार्षिक कला महोत्सवांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील विविध कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

'कलान्तर २०२६'चा उद्देश विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कलात्मक अभिव्यक्ती, कौशल्य विकास आणि सर्वांगीण शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा आहे. महोत्सवामध्ये चित्रकला, शिल्पकला, सृजनशील लेखन, गायन, नृत्य आणि अभिनय आदी विविध कला प्रकारांतील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा समावेश आहे.

स्पर्धेसाठी १ जुलै २०२६ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ह्रीींिः//ज्ञरश्ररपींरीीं.ीस/ ऋ या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन प्रवेशिका सादर करता येतील. 'कलान्तर'च्या महत्त्वपूर्ण उपक्रमांपैकी वार्षिक कला महोत्सव हा एक प्रमुख उपक्रम असून, गेल्या १५ वर्षांत या महोत्सवांतर्गत आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन स्पर्धांमध्ये देशभरातील लाखो स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे. यामध्ये राज्य मंडळांशी संलग्न शाळा व महाविद्यालये, सांस्कृतिक संस्था, कारागृहे, बालसुधारगृहे, वृद्धाश्रम, महिला निवारा केंद्रे आणि अनाथालये यांचा सहभाग राहिला आहे.

जिल्ह्यातील सर्व सरकारी व खासगी शाळा, महाविद्यालये, बालसुधारगृहे, कारागृहे, वृद्धाश्रम, अनाथालये, महिला निवारा केंद्रे तसेच विद्यार्थी आणि कलाप्रेमींनी या राष्ट्रीय कला महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.



# मुंबई येथे राज्याचे पोलीस महासंचालक सदानंदजी दाते यांची सदिच्छा भेट

देगलूर /प्रतिनिधी

बिलोली विधानसभा मतदारसंघ हा कर्नाटक-तेलंगणा सीमावर्ती भागात असल्याने,या भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेसंदर्भात व विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सीमावर्ती भागात शांतता, कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मा. पोलीस महासंचालकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच संबंधित विभागास आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# छत्रपती संभाजीनगर नळपाणी योजनेवर चौकशीचा फास.!

## निकृष्ट कामांच्या तक्रारींची उच्चस्तरीय चौकशी, दर १५ दिवसांनी होणार आढावा

मुंबई । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर नळपाणी योजनेतील कामांच्या गुणवत्तेबाबत झालेल्या तक्रारींची नगरविकास विभागामार्फत उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात येणार असून, महिनाभरात अहवाल सादर केला जाईल, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत केली.सदस्य अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मंत्री सामंत म्हणाले की, २००९ मध्ये मंजूर झालेल्या या योजनेची मूळ किंमत ३५९.६७ कोटी होती. प्रकल्प रखडल्याने खर्च वाढून तो आता २,७४०.७५ कोटींवर पोहोचला असून, ८३.५ टक्के काम पूर्ण झाले आहे.जलशुद्धीकरण केंद्रासह काही कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे काम व मंजूर साहित्याऐवजी अन्य साहित्य वापरल्याच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जाणार आहेत. या सर्व बाबींची सखोल चौकशी करून दोषींवर आवश्यक कारवाई केली जाईल. तसेच योजनेच्या प्रगतीचा दर १५ दिवसांनी ऑनलाइन आणि प्रत्यक्ष पाहणीद्वारे आढावा घेतला जाईल, असे सामंत यांनी स्पष्ट केले.

योजना लवकर पूर्ण करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# शासकीय प्रवेशद्वारातच चहाचे दुकान पाटबंधारे विभागावर प्रश्नचिन्ह

## कार्यकारी अभियंता एस. एन. पवार यांनी खुलासा करावा - डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी


शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू असताना पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातच चहाचे दुकान सुरू झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या दुकानामुळे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना ये-जा करण्यास अडथळा होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. संबंधित चहावाल्यास शासकीय जागा वापरण्याची अधिकृत परवानगी देण्यात आली आहे का ?, अथवा जागा भाड्याने देण्यात आली आहे का ?, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर करावी व नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.शहरातील अतिक्रमणांवर कठोर कारवाई होत असताना शासकीय कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातच व्यवसाय सुरू राहणे ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.



कार्यकारी अभियंता बीड पाटबंधारे विभागाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आत चहाचे दुकान...... डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर



पाटबंधारे विभागाच्या आता चहाचे दुकान...

# विद्यार्थ्यांना वर्षभर शिक्षक मिळणार

## आता बदली प्रक्रिया शाळा सुरू होण्यापूर्वीच पूर्ण होणार.!

मुंबई । प्रतिनिधी

शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांची पदोन्नती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नवी नियमावली तयार करण्यात येणार असल्याची घोषणा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत केली.

आ.श्रीजया चव्हाण यांच्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री गोरे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार टीईटी पात्रता अनिवार्य असल्याने तसेच न्यायालयीन प्रकरणांमुळे पदोन्नती प्रक्रिया विलंबित झाली आहे. त्यामुळे समायोजन आणि बदल्यांवर परिणाम झाला.

सध्या मुख्याध्यापक पदासाठी पदोन्नती प्रक्रिया सुरू असून, त्यानंतर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले जाईल. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यमान बदली प्रक्रिया अधिक सुलभ करून शाळेच्या पहिल्याच दिवसापासून विद्यार्थ्यांना पूर्णवेळ शिक्षक उपलब्ध होतील, यासाठी शासन आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याचे मंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.

शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांची पदोन्नती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नवी नियमावली तयार करण्यात येणार असल्याची घोषणा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत केली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिल्हा नियोजन व विकास समितीच्या सदस्यपदी अनिताताई जगताप यांची निवड

शिर्डी (प्रतिनिधी) – अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन व विकास समितीच्या सदस्यपदी शिर्डीच्या माजी नगराध्यक्षा अनिताताई विजयाराव जगताप यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा नियोजन व विकास समिती ही जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाची समिती मानली जाते. या समितीमध्ये पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी आणि शासनाने नियुक्त केलेले सदस्य असतात. राज्य सरकारकडून दरवर्षी निधी मिळतो. हा निधी जिल्ह्याच्या गरजेनुसार विविध विकास कामांसाठी मंजूर केला जातो.

मतदारसंघातील गरजा ओळखून विकास कामांचे प्रस्ताव तयार करणे,




अधिकाऱ्यांशी समन्वय साधून प्रस्ताव वेळेत सादर करणे, लोकांच्या प्रश्नांना प्राधान्याने मांडणे, मंजूर कामांची नियमित पाहणी करून दर्जा आणि प्रगती तपासणे, निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर होत आहे यावर लक्ष ठेवणे अशा विविध समस्यांची सोडवणूक याकरिता समितीत सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

अनिताताई जगताप यांचे सासरे माजी सरपंच सोपानराव जगताप यांच्याकडून त्यांनी सामाजिक कामांची प्रेरणा घेतली. पती माजी उपनगराध्यक्ष विजयाराव जगताप यांच्यासोबत सामाजिक कामातून शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला. वेळोवेळी आंदोलने देखील केली.त्यांनी शिर्डी नगरपंचायत नगरसेविका, गटनेते व नगराध्यक्षा, साईबाबा संस्थान विश्वस्त, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष, सहसंपर्कप्रमुख असे विविध पदांची जबाबदारी त्यांनी उत्तमरित्या सांभाळली आहे.जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी छत्रपती मित्रमंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमदेखील राबवले आहेत.त्यांची निवड झाल्याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांचा सन्मान करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

माननीय महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब शिंदे शिवसेनेच्या वतीने अनिताताई यांची निवड झाली.

# गेवराई पोलीसांची अवैध वाळु वाहतुकीवर कारवाई



गेवराई शहरातून अशोक लिलैंड कंपनीचा बडा दोस्त पिकअपवर कारवाई करून ०९,०६,०००/ –रू चा मुद्देमाल केला जप्त

गेवराई(प्रतिनिधी):-मा.पोलीस अधीक्षक श्री. नवनती काँवत, यांच्या अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलीसांनी पथक तयार करून दिनांक १०.०७.२०२६ रोजी अवैध वाळु वाहतूक करणाऱ्याविरूध्द धडक मोहीम राबवून गेवराई शहर व परिसरात पेट्रोलींग करत असताना रात्री ००.१५ वा. चे सुमारास शिवाजीनगर कोल्हेर रोडने एक विना नंबरचा पांढऱ्या रंगाचा अशोक लिलैंड कंपनीचा बडा दोस्त पिकअप विनापरवाना बेकायदेशिर रित्या वाळु/गौण खणीजची चोरी करुन तिची विक्री करण्याकरीता वाहतुक करीत असतांना मिळून आला. सदर पिकअप व पिकअप चालकास ताब्यात घेऊन एकूण ०९,०६,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस ठाणे गेवराई येथे जितेंद्र आत्माराम ओव्हाळ, पोकाॅ/२११२ यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे गेवराई गुरनं. ४१९ / २०२६, कलम-३०३(२) भा.न्या.संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा.नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा. समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, सपोनि. अतुलकुमार लांडगे, सपोनि. समाधान दौड, पोह/२२३ कल्याण राठोड, पोकाॅ/ २४१ गोरक्ष डोके, पोकाॅ / २११२ जितेंद्र ओव्हाळ यांनी सदर कारवाईत सहभाग घेतला.

# जात पडताळणीच्या कामासाठी ३ हजारांची लाच घेताना लेखापाल रंगेहात पकडला

बीड प्रतिनिधी : जात पडताळणी प्रमाणपत्राच्या कामासाठी ३ हजार रुपयांची लाच मागून स्वीकारणाऱ्या समाजकल्याण विभागातील लेखापालाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी (दि. १०) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समाजकल्याण विभागातील लेखापाल राठोड अण्णासाहेब गबरू यांनी तक्रारदाराच्या जात पडताळणी प्रमाणपत्राशी संबंधित कामासाठी ३ हजार रुपयांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर



एसीबीच्या पथकाने सापळा रचला. त्यानुसार राठोड अण्णासाहेब गबरू यांना तक्रारदाराकडून ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

# संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे मिडसांगवी मध्ये पहिले रिंगण
## पैठणच्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

अहिल्यानगर / प्रशांत बाफना

हरिनामाचा जयघोष टाळ मृदुंगांच्या नादात श्री संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे पहिले रिंगण सोहळा पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे पार पडला. श्रीक्षेत्र पैठण येथून निघणाऱ्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या पालखीचे पहिले रिंगण सोहळ्याचा मान दरवर्षी प्रमाणे मिडसांगवी येथे पार पडतो. या पालखीमध्ये खानदेश, विदर्भ, मराठवाडा मधुन अनेक दिंड्या सहभागी झाल्या आहे

पालखी मिडसांगवी गावच्या सरहद्दीवर आल्यानंतर सालसिद्ध बाबा संस्थांनचे महंत हनुमंत महाराज शास्त्री व समस्त गावकऱ्यांच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले. संपूर्ण गाव परिसरामध्ये पालखीची मिरवणूक काढण्यात आली. व त्यानंतर दुपारी तीन वाजता पहिले रिंगण पुष्प पार पडले. या सोहळ्यामध्ये अश्व रिंगणी धावले. यावेळी गावकऱ्यांसह भाविकांचा आनंद द्विगुनीत झाला होता. यावेळी वारकऱ्यांसह आलेल्या सर्व परिसरातील भाविकांना बाबुराव पठाडे यांच्याकडून महाप्रसाद देण्यात आला. पालखीला निरोप देण्यासाठी खरवंडी कासार परिसरातील सर्व भाविकांनी हजेरी लावली. यावेळी संत एकनाथ महाराजांचे ११ वे वंशज रघुनाथ महाराज सह सालसिद्ध बाबा संस्थांनचे महंत हनुमंत महाराज शास्त्री प्रांताधिकारी प्रसाद मते साहेब, तहसीलदार उद्धव नाईक सह पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, मंडळ अधिकारी सोनवणे, तलाठी निलवडे, कदम मॅडम, ग्रामसेवक दातीर भाऊसाहेब सह परिसरातील सर्व भाविक हजर




# केज येथे विलास घुले हत्या प्रकरणी मोर्चा
## ‘गौरव सोनवणे यांना अटक करा’, ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांची मागणी

केज /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील टाकळी येथील विलास घुले हत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी (१० जुलै) कडा येथे मोर्चा काढण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे तहसील कार्यालयावर काढण्यात आलेल्या या मोर्चात विविध समाजबांधव व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मोर्चानंतर आयोजित सभेत ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी राज्य सरकार व पोलीस प्रशासनावर टीका केली. विलास घुले हे वाद मिटविण्यासाठी गेले असताना त्यांची हत्या झाल्याचा उल्लेख करत त्यांनी या प्रकरणातील आरोपींवर मोक्का (चउजउ-) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली. तसेच, पुरवणी जबाबात नाव आल्याचा




दावा करत खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र गौरव सोनवणे यांना अटक करण्याची मागणी त्यांनी केली.

याशिवाय या प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक न्यायालयात करण्यात यावी, मृत विलास घुले यांच्या पत्नीला शासकीय नोकरी द्यावी तसेच फिर्यादी रमेश घुले यांना सशस्त्र पोलीस संरक्षण द्यावे, अशा मागण्याही मोर्चेकऱ्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केल्या.

सभेत बोलताना नवनाथ वाघमारे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस प्रशासनावर जातीय निकषांवर कारवाई होत असल्याचा आरोप केला. तसेच, खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलावर कारवाई न होण्यामागे राजकीय कारणे असू शकतात, असा दावाही त्यांनी केला.

# बीड शहरातील वक्फ सेवा इनाम जमिनीवर पत्र्याचे शेड बांधकाम थांबविण्याची मागणी

बीड(प्रतिनिधी) : बीड शहरातील तेलगाव रोड येथील सर्व्हे क्र. ११५ ही वक्फ सेवा इनाम जमीन असून, कलीम अहमद शेख वो शेख हमीद पाशा मिया हे सदर जमिनीचे वारस असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या जमिनीवर शेख शाहेद यांनी कोणतीही वैध परवानगी न घेता पत्र्याचे शेड उभारल्याचा दावा करत कलीम अहमद शेख यांनी प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी केली आहे.

याप्रकरणी जिल्हा वक्फ अधिकारी, बीड, तहसीलदार, बीड, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आली आहेत.निवेदनात म्हटले आहे की, सदर वक्फ सेवा इनाम जमिनीवर परवानगीशिवाय पत्र्याचे शेड उभारण्यात आले असून, संबंधित बांधकाम तात्काळ थांबवून कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. तसेच जमिनीचे संरक्षण करून पुढील कोणतेही अनधिकृत बांधकाम होऊ नये, अशीही मागणी करण्यात आली आहे.

कलीम अहमद शेख यांनी पुढे म्हटले आहे की, संबंधित व्यक्तीस बांधकामाबाबत विचारणा केली असता



## चार शासकीय कार्यालयांकडे निवेदने

शिवीगाळ करण्यात आली. त्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलीस प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून वक्फ सेवा इनाम जमिनीचे संरक्षण करावे, आवश्यक असल्यास पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा तसेच संबंधित व्यक्तीने उभारलेल्या पत्र्याच्या शेडबाबत कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी कलीम अहमद शेख यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियानाला अधिक वेग
## ७ ते १० जुलै दरम्यान ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबिरे

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण ( एस . आय . आर . ) – २०२६ अभियानाला बीड जिल्ह्यात अधिक गती देण्यात आली असून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली दि . ७ ते १० जुलै या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे . या शिबिरांमध्ये प्रत्येक पात्र मतदाराचे गणना प्रपत्र अचूकपणे भरून घेणे , आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच मतदार यादी अधिक अचूक , पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यावर भर देण्यात येत आहे .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील , उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयातून संपूर्ण निवडणूक व महसूल यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहे . काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः बीड शहरात घरभेटी देत अभियानाचा शुभारंभ केला होता . त्यानंतर सातत्याने आढावा बैठका , प्रत्यक्ष पाहणी आणि क्षेत्रभेटी घेऊन कामाला अधिक वेग देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . त्याच अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी विशेष आदेश निर्गमित करून बूथस्तरीय अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , कृषी सहाय्यक , पोलीस पाटील , महसूल सेवक , सरपंच , ग्रामपंचायत सदस्य तसेच स्वस्त धान्य दुकानदार यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याच्या सूचना दिल्या आहेत .

प्रत्येक गावात विशेष शिबिरे सुरू करण्यात आली असून बूथस्तरीय अधिकारी यांच्यासह नियुक्त सहाय्यक कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून गणना प्रपत्रांचे वाटप , भरणे आणि पडताळणीचे काम करीत आहेत . पावसाळ्याचा विचार करून शिबिरांसाठी सुरक्षित व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . गावोगावी दवंडी , ध्वनिक्षेपक , समाजमाध्यमे आणि स्थानिक जनप्रतिनिधी यांच्या माध्यमातून जनजागृती

### प्रत्येक पात्र मतदाराने गणना प्रपत्र भरून देऊन लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी सहकार्य करावे – जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन





करण्यात येत असून कोणताही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहू नये , यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे .

सध्या जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागात स्वस्त धान्य दुकानदार , ग्राम रोजगार सेवक , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक , कृषी सहाय्यक आणि इतर सहाय्यक कर्मचारी यांची बूथस्तरीय अधिकारी यांच्या सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे . त्यामुळे घराघरात पोहोचून गणना प्रपत्रांचे वितरण , माहितीची पडताळणी आणि नागरिकांना मार्गदर्शन करण्याचे काम अधिक प्रभावीपणे सुरू आहे . नागरिकांकडूनही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक ठिकाणी स्वयंप्रेरणेने मतदार गणना प्रपत्र भरून देत आहेत .

प्रशासनाने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की , गणना प्रपत्र भरताना नाव , पत्ता , जन्मतारीख , भ्रमणध्वनी क्रमांक , आधारविषयक तपशील , अद्ययावत छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे अचूकपणे उपलब्ध करून द्यावीत . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की , अचूक , पारदर्शक आणि सर्वसमावेशक मतदार यादी ही सक्षम लोकशाहीचा मजबूत पाया आहे . प्रत्येक पात्र मतदाराची नोंद होणे अत्यंत आवश्यक असून कोणताही मतदार वंचित राहू नये , यासाठी सर्वांनी बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे . तसेच अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही सर्व नागरिकांनी विशेष शिबिरांना उपस्थित राहून आपले गणना प्रपत्र वेळेत भरून द्यावे आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा , असे आवाहन केले आहे .

जिल्ह्यातील २ हजार ४१६ मतदान केंद्रांवरील २१ लाख ९३ हजार ८२७ मतदारांपैकी आतापर्यंत ६ लाख ७९ हजार ५५० गणना प्रपत्रांचे वितरण पूर्ण झाले असून हे प्रमाण ३० . ९८ टक्क्यांवर पोहोचले आहे . त्यापैकी १ लाख ४७ हजार ५३० गणना प्रपत्रांचे संगणकीकरण पूर्ण झाले असून १ लाख ४६ हजार ९२९ प्रपत्रांची बूथस्तरीय अधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात आली आहे . जिल्ह्यातील कामाचा वेग दिवसेंदिवस वाढत असून प्रशासनाने आगामी काही दिवसांत उर्वरित सर्व मतदारांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन केले आहे .

तालुकानिहाय आढाव्यात अंबाजोगाई तालुका सर्वाधिक आघाडीवर असून तेथे १ लाख १७ हजार २३८ गणना प्रपत्रांचे वितरण करून ५० . ५६ टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे . त्यापाठोपाठ वडवणी ( ४५ . ९१ टक्के ) , धारूर ( ४३ . २० टक्के ) , माजलगाव ( ३७ . ५१ टक्के ) , गेवराई ( ३६ . २३ टक्के ) , केज ( ३२ . ५३ टक्के ) , शिरूर ( ३१ . ८२ टक्के ) , पाटोदा ( २९ . ९६ टक्के ) , आष्टी ( २५ . ७१ टक्के ) , परळी ( २१ . ९७ टक्के ) तर बीड तालुक्यात ६७ हजार २०० गणना प्रपत्रांचे वितरण करून १५ . ३९ टक्के प्रगती नोंदविण्यात आली आहे . प्रत्येक तालुक्यातील प्रगतीचा दररोज आढावा घेतला जात असून ज्या भागात प्रगती कमी आहे , तेथे अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येत आहे .

प्रत्येक गावात विशेष शिबिरे सुरू करण्यात आली असून बूथस्तरीय अधिकारी यांच्यासह नियुक्त सहाय्यक कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून गणना प्रपत्रांचे वाटप , भरणे आणि पडताळणीचे काम करीत आहेत . पावसाळ्याचा विचार करून शिबिरांसाठी सुरक्षित व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . गावोगावी दवंडी , ध्वनिक्षेपक , समाजमाध्यमे आणि स्थानिक जनप्रतिनिधी यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून कोणताही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहू नये , यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे .




बीड प्रहार चे संपादक अशोक नाना होळकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना जरुड चे सरपंच श्रीराम काकडे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, पत्रकार किशोर कुलकर्णी, जाकेर सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते

# मतदानापासून रोखण्यासाठी संचालकाचे अपहरण, भाजप नेत्याच्या भावाला पळवून नेले

अहिल्यानगर/प्रतिनिधी

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी ठराव प्रक्रियेची तयारी सुरू असताना पारनेर तालुक्यातील तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथील दोन संचालकांच्या अपहरणापाठोपाठ लोणी हवेली येथे असाच प्रकार घडला आहे. भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष चांगदेव दुधाडे यांनी त्यांच्या भावाला मतदानापासून रोखण्यासाठी पळवून नेल्याचा गंभीर आरोप करत पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

सुभाष दुधाडे (वय ५५) हे लोणी हवेली येथील रहिवासी असून ते शेती व्यवसाय करतात. ते भारतीय जनता पक्षाचे अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस आहेत. गावातील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या ठरावासाठी १३ जुलै रोजी निवडणूक होणार असून, त्यामध्ये संचालक मंडळ मतदान करणार आहे. या मतदानात त्यांचे भाऊ शिवाजी चांगदेव दुधाडे हे मतदार आहेत.

दुधाडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ९ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजल्यापासून त्यांचे भाऊ शिवाजी दुधाडे हे बेपत्ता झाले. त्यांचा मोबाईल फोनही बंद असल्याचे आढळून आले. दरम्यान, रात्री सुमारे ९.५१ वाजता गावातील अमोल विक्रम दुधाडे, जो राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा कार्यकर्ता आणि विद्यमान उपसरपंच असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे, त्याने संभाजी दुधाडे यांना फोन करून शिवाजी आप्पांना कोणत्या गोळ्या चालू आहेत, ते सांगा. ते माझ्यासोबत आहेत, असे सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर सुभाष दुधाडे, संभाजी दुधाडे आणि इतर नातेवाईकांनी शिवाजी दुधाडे यांचा शोध घेतला. मात्र त्यांचा मोबाईल बंद असल्याने संपर्क होऊ शकला नाही. तसेच अमोल दुधाडे यांचाही मोबाईल बंद आढळून आल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. शिवाजी दुधाडे हे घरी परतले नसून, सोसायटीच्या ठराव बैठकीत त्यांनी त्यांच्या पसंतीच्या गटाला मतदान करू नये, या उद्देशाने अमोल विक्रम दुधाडे यांनी त्यांना पळवून नेऊन कुठेतरी लपवून ठेवल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे.या प्रकरणामुळे लोणी हवेलीसह संपूर्ण पारनेर तालुक्यात राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे. पारनेर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीच्या आधारे पोलीस पुढील तपास करत आहेत

# जनतेच्या कामात हलगर्जी खपवून घेणार नाही

# भ्रष्टाचार करणाऱ्यांवर थेट कारवाई होणार

## खा.डॉ. कल्याणराव काळे यांचा अधिकाऱ्यांना सज्जड दम भोकरदन तहसील येथील आढावा बैठकीत कडक इशारा

भोकरदन इसरारखान पठाण :-

ग्रामीण भागातील गरीब शेतकरी आणि सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवायला लावणे आणि पैशांसाठी अडवणूक करणे आता खपवून घेतले जाणार नाही. सामान्य माणसाचे काम वेळेत आणि एकही रुपया न घेता झालेच पाहिजे.भ्रष्टाचार करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही अशा कडक आणि आक्रमक शब्दात जालना जिल्ह्याचे नवनियुक्त खासदार डॉ. कल्याणराव काळे यांनी प्रशासकीय यंत्रणेला थेट सज्जड दम दिला.भोकरदन तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सर्व विभागांच्या धडक आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत शेतकरी,नागरिक आणि पत्रकारांनी प्रशासकीय अनागोंदीचा पाढाच वाचल्याने वातावरण चांगलेच तापले होते.

नेत्यांची तगडी फौज आणि अधिकाऱ्यांची उपस्थिती

या अत्यंत महत्त्वाच्या आणि वादळी ठरलेल्या आढावा बैठकीला खासदार डॉ. कल्याणराव काळे यांच्यासोबत माजी आमदार चंद्रकांत दानवे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, शिवसेनेचे उबाठा जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, राजाभाऊ देशमुख, ज्ञानेश्वर भांदरगे, रमेश शेठ सपकाळ, त्र्यंबक आप्पा पाबळे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनाच्या वतीने तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे, नायब तहसीलदार बालाजी पूपलवाड, गटविकास अधिकारी श्रीकृष्ण वेणीकर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी नामदेव गाडेकर, उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी आणि सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

जनतेचा आक्रोश भ्रष्टाचाराचा पाढा वाचला खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तालुक्यातील प्रत्येक गावातील शेतकरी, शेतमजूर, समाजसेवक आणि व्यापाऱ्यांना आपले प्रश्न मांडण्याची खुली सूट दिली. त्यानंतर बैठकीत तक्रारींचा पाऊस पडला आणि अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या

घरकुल अन् विहिरींसाठी घरकुल आणि विहीर योजनेसाठी अधिकारी, पंचायत समिती आणि रोजगार सेवक उघडपणे पैशांची मागणी करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला.

संजय गांधी निराधार योजनेत वशिलेबाजी या योजनेत गोरगरिबांना डावलून केवळ तोंड पाहून आणि वशिलेबाजीने कामे केली जात असल्याचा संताप व्यक्त झाला.

अधिकारी करतायत त्रास जन्म दाखल्यासाठी महिन्यान् महिने फायली धूळ खात पडल्या आहेत. तलाठी वारस फेर करून देत नाहीत तर विहिरींचे मस्टर वेळेवर काढले जात नसल्याने शेतकरी हवालदिल आहेत.

नेत्यांसाठी जागा आरक्षित राजूर येथील अप्पर तहसीलसाठी १७ गुंठे जागा आरक्षित असताना ती कोण्या नेत्यासाठी राखून ठेवली आहे का? असा रोखठोक सवाल उपस्थित करण्यात आला.

तहसीलदारांवर गंभीर आरोप सिपोरा बाजार येथील पोट भरण्यासाठी बाहेरगावी गेलेल्या लोकांची नावे मतदार यादी किंवा ग्रामपंचायतीतून वगळण्यासाठी तहसीलदारांनी पत्र दिल्याचा खळबळजनक आरोप रहमान भाई यांनी केला. तसेच भोकरदन शहरातील सर्वे नंबर ३९ च्या प्रश्नावर ११ दिवस उपोषण करूनही तहसीलदार पंचनामा करत नसल्याचे सांगत प्रशासनाचा संतापजनक कारभार चव्हाट्यावर आणला.

शिक्षणाचा खेळखंडोबा: शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असताना त्यांना एसआयआर च्या कामाला लावल्याने



विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. हे काम बेरोजगार तरुणांना द्यावे अशी मागणी झाली.

खासदारांचे अधिकाऱ्यांना फायनल वॉर्निंग आणि थेट आदेश अडवणूक थांबवा तहसील,पंचायत समिती आणि नगरपरिषदेत येणाऱ्या शेतकरी, मजुरांना विनाकारण चकरा मारायला लावू नका. कामे तात्काळ मार्गी लावा.

सन्मानाने वागवा: शासकीय कार्यालयात येणारा प्रत्येक नागरिक हा सन्मानाचा हक्कदार आहे. त्याला अरेरावी खपवून घेतली जाणार नाही.

लाच मागितली तर खैर नाही: कोणत्याही योजनेत पैशांची मागणी केल्याची तक्रार आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर थेट निलंबनाची व फौजदारी कारवाई केली जाईल.पारदर्शकता आणा: संजय गांधी निराधार योजना, घरकुल, विहीर योजनांमध्ये केवळ आणि केवळ पात्र लोकांनाच लाभ मिळाला पाहिजे.१५ दिवसांत अहवाल द्या: बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रत्येक समस्येची नोंद घेण्यात आली असून संबंधित विभागप्रमुखांनी १५ दिवसांच्या आत याचा सविस्तर अहवाल सादर करावा.प्रशासनाचा केंद्रबिंदू सामान्य माणूसच

बैठकीचा समारोप करताना खासदार डॉ. कल्याणराव काळे यांनी अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले की प्रशासनाने स्वतःला जनतेचे सेवक समजावे. सर्वसामान्य माणूस हाच व्यवस्थेचा केंद्रबिंदू असला पाहिजे. जे अधिकारी काम करणार नाहीत किंवा जनतेला त्रास देतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यासाठी माझे हात मागेपुढे पाहणार नाहीत.

खासदारांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे भोकरदन तालुक्यातील कामचुकार आणि लाचखोर अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून आता तरी तालुक्यातील शासकीय कारभारात सुधारणा होईल आणि सर्वसामान्यांना न्याय मिळेल अशी आशा जनतेतून व्यक्त होत आहे.





# आ.सुरेश धस यांच्या सूचनेनंतर आष्टीचे नवीन बसस्थानक सुरू करण्याच्या हालचालींना वेग

विद्युत कामे पूर्ण;उर्वरित किरकोळ कामे तीन-चार दिवसांत पूर्ण होणार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील बहुप्रतीक्षित नवीन राज्य परिवहन बसस्थानक लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होण्याची शक्यता असून, आमदार सुरेश धस यांच्या सूचनेनंतर बसस्थानक कार्यान्वित करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. दि. ५ जुलै २०२६ रोजी आमदार सुरेश धस यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून नवीन बसस्थानक तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यानुसार ८ जुलै रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या स्थापत्य व विद्युत शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवीन बसस्थानकाची सविस्तर पाहणी केली.

पाहणीदरम्यान बसस्थानकातील फॅन, ट्यूबलाईट, यार्ड लाईट, मीटर, इन्व्हर्टर आदी विद्युत सुविधांची तपासणी करण्यात आली. आवश्यक किरकोळ दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्यात आल्याने विद्युत विभागाकडील सर्व कामे पूर्ण झाली असून,

बस स्थानक वाहनतळ काँक्रिटीकरणाचा प्रस्ताव एसटी महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मंजुरी मिळताच आष्टी बस स्थानकाच्या वाहन तळाच्या काँक्रिटीकरणाचे काम चालू करण्यात येणार असून या संदर्भातील कोणतेही काम आता प्रलंबित नसल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

याशिवाय स्थापत्य विभागाशी संबंधित उर्वरित किरकोळ कामांचीही पाहणी करण्यात आली. ही कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश आमदार सुरेश धस यांनी संबंधित कंत्राटदारांना दिले असून, पुढील तीन ते चार दिवसांत ही सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण केली जाणार आहेत. सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर आमदार सुरेश धस आणि राज्य परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त पाहणी करण्यात येणार आहे. त्यानंतर नवीन बसस्थानक प्रवाशांच्या सेवेत सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असून, प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य परिवहन प्रशासनाकडून आवश्यक तयारी सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला आष्टीच्या नवीन बसस्थानकाचा प्रश्न आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा बहुप्रतीक्षित प्रकल्प प्रत्यक्षात येत असल्याने नागरिकांमधून समाधान आणि आनंद व्यक्त केला जात आहे.

# केवळ वृक्षारोपण नव्हे तर वृक्षसंवर्धनाला प्राधान्य द्या

## स्वयंसेवी संस्थांना संधी देण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करा-आ.सुरेश धस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०२६ मधील शुक्रवार, दि. १० जुलै रोजी झालेल्या प्रश्नोत्तरे सत्रात लोकनेते, मराठवाडा भूषण तथा आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी राज्यातील वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाच्या विषयावर अत्यंत महत्त्वाचा आणि जनहिताचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. राज्यभरात दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहिमा राबविल्या जात असल्या, तरी लागवडीनंतर त्या झाडांचे संगोपन, संरक्षण आणि नियमित देखभाल याकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची बाब त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

आ. सुरेश धस यांनी आपल्या प्रश्नाद्वारे स्पष्ट केले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, हवामान बदलाच्या वाढत्या संकटाला तोंड देण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित पर्यावरण देण्यासाठी वृक्षारोपण हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. मात्र, केवळ वृक्षारोपणाचे आकडे वाढवून किंवा ठरावीक उद्दिष्ट पूर्ण करून पर्यावरण संवर्धनाचा हेतू साध्य होणार नाही. प्रत्यक्षात लावलेली झाडे किती जिवंत राहतात, त्यांची वाढ किती चांगली होते आणि त्यांचे दीर्घकालीन संवर्धन कशा पद्धतीने केले जाते, यालाच अधिक महत्त्व आहे.

त्यांनी सभागृहात सांगितले की, अनेक ठिकाणी वृक्षारोपणानंतर काही महिन्यांतच पाणी, संरक्षण, कुंपण, खत व्यवस्थापन आणि नियमित देखभालीअभावी मोठ्या प्रमाणावर रोपे नष्ट होतात. त्यामुळे शासनाचा निधी खर्च होऊनही पर्यावरण संवर्धनाचा उद्देश पूर्ण होत नाही. यासाठी वृक्ष लागवडीसोबतच त्यांच्या




किमान तीन ते पाच वर्षांच्या संगोपनासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी आ. धस यांनी शासनाला महत्त्वपूर्ण सूचना करत वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची कामे केवळ कंत्राटदारांमार्फत न राबविता, पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी संघटना आणि निसर्ग संवर्धनासाठी काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना प्राधान्य देण्याची मागणी केली. अशा संस्था आर्थिक नफ्याच्या उद्देशाने नव्हे, तर सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संवर्धनाच्या भावनेतून काम करतात. त्यामुळे त्यांच्याकडून वृक्षांचे संगोपन अधिक जबाबदारीने, पारदर्शकपणे आणि परिणामकारक पद्धतीने केले जाऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

आ. सुरेश धस यांनी पुढे सांगितले की, राज्यात अनेक स्वयंसेवी संस्था गेल्या अनेक वर्षांपासून स्वतःच्या प्रयत्नातून वृक्षलागवड, जलसंवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि पर्यावरण जनजागृतीची उल्लेखनीय कामे करत आहेत. अशा संस्थांच्या अनुभवाचा शासनाने उपयोग करून घेतला, तर वृक्षसंवर्धन मोहिमेला अधिक बळ मिळेल. त्यासाठी आगामी काळातील टेंडर प्रक्रियेत स्वयंसेवी संस्थांचा सहभाग निश्चित करण्यासाठी स्वतंत्र धोरण, स्पष्ट निकष आणि नियमावली तयार करण्यात यावी. पात्र संस्थांना संधी दिल्यास वृक्ष लागवडीचा टिकाव वाढेल आणि शासनाच्या पर्यावरणविषयक उपक्रमांना अधिक यश मिळेल, अशी ठाम भूमिका त्यांनी सभागृहात मांडली.

आ. धस यांच्या या सूचनेवर उत्तर देताना वन विभागाचे मंत्री छत्रपती मा. ना. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनालाही शासन तितकेच महत्त्व देत असून, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविण्याबाबत शासन सकारात्मक आहे. यासाठी आवश्यक धोरणात्मक बदल, नियमावली आणि कार्यपद्धती तयार करण्याबाबत शासन विचार करेल तसेच संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.

मंत्री महोदयांनी दिलेल्या या सकारात्मक आश्वासनाचे सभागृहात स्वागत करण्यात आले. राज्यातील वृक्षारोपण मोहिमांना अधिक परिणामकारक स्वरूप देण्यासाठी तसेच लावलेले प्रत्येक झाड जगविण्याच्या दृष्टीने शासनाच्या धोरणात आवश्यक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पर्यावरण संरक्षण, हवामान बदलाचा सामना, भूजल संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि हरित महाराष्ट्राच्या उभारणीसाठी केवळ वृक्ष लागवड न करता प्रत्येक झाडाचे संवर्धन हीच काळाची गरज असल्याचा स्पष्ट संदेश आ. सुरेश धस यांनी आपल्या मांडणीतून दिला. त्यांच्या या मागणीमुळे राज्यातील पर्यावरण संवर्धनाच्या धोरणाला नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# लोणीतील दिलखुलास,विनोदी स्वभावाचे हाडाचे शेतकरी मंजाबापू डहाळे यांचे निधन

## गावावर शोककळा,असंख्य नागरिकांनी दिला अखेरचा निरोप

**आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील लोणी येथील डहाळे वस्तीवरील सर्वपरिचित, मनमिळाऊ, दिलखुलास व विनोदी स्वभावामुळे सर्वांच्या गळ्यातील ताईत ठरलेले ज्येष्ठ शेतकरी मंजाबापू डहाळे यांचे आज (दि. १० जुलै) सायंकाळी सुमारे ५.३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय सुमारे ८५ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे लोणी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून, एका प्रेमळ, विनोदप्रिय आणि सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे नाते जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला गाव मुकल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.**

स्वर्गीय मंजाबापू डहाळे हे जिल्हा परिषद शिक्षक पोपट मंजाबापू डहाळे तसेच संतोष मंजाबापू डहाळे यांचे वडील होत. अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक आणि जमिनीशी नाळ जोडून आयुष्यभर शेती करणारे ते हाडाचे शेतकरी म्हणून ओळखले जात होते. आधुनिकतेचा स्वीकार करतानाही त्यांनी शेती आणि ग्रामीण संस्कृतीशी असलेले नाते कधीही तुटू दिले नाही. आपल्या कष्ट, प्रामाणिकपणा आणि साधेपणामुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली होती.

मंजाबापू डहाळे यांचा स्वभाव हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात मोठा पैलू होता. गावात कोणत्याही चौकात, शेतात किंवा सार्वजनिक ठिकाणी ते दिसले की आजूबाजूचे वातावरण क्षणात प्रसन्न होत असे. प्रत्येकाशी आपुलकीने बोलणे, एखाद्यावर निरागसपणे चेष्टा-मस्करी करणे, मिश्किल विनोदातून सर्वांना हसविणे आणि कोणाच्याही मनात कटुता निर्माण होणार नाही अशा पद्धतीने संवाद साधणे, ही त्यांची खास शैली होती. त्यामुळे गावातील लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच त्यांचा सहवास आवडत असे.

गावातील सामाजिक, धार्मिक आणि कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये त्यांची उपस्थिती म्हणजे जणू उत्साहाचे केंद्रच असायचे. त्यांच्या बोलण्यातून आणि विनोदातून अनेकांना मानसिक आधार मिळत असे. संकटाच्या काळातही धीर देत सकारात्मक विचार मांडण्याची त्यांची वृत्ती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली. त्यामुळे त्यांना केवळ शेतकरी म्हणून नव्हे तर एक आनंदी, दिलदार आणि सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून गावात विशेष मान होता.

मागील काही दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यानच आज त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच लोणीसह परिसरातील ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डहाळे कुटुंबीयांच्या निवासस्थानी धाव घेत त्यांचे सांत्वन केले.



स्वर्गीय मंजाबापू डहाळे यांच्यावर (दि. १० जुलै) सायंकाळी ८ वाजता अमरधाम स्मशानभूमी, लोणी (पिंपळा रोड) येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ, विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी अश्रुपूर्ण वातावरणात त्यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने डहाळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, लोणी गावाने एक हसतमुख, प्रेमळ, समाजशील आणि विनोदातून माणसे जोडणारे ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व गमावले आहे. प्रभू श्री विठ्ठल-पांडुरंगाच्या चरणी स्वर्गीय मंजाबापू डहाळे यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो आणि डहाळे परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



पैठण प्रतिनिधी/ता ९ पैठण तालुक्यातील नांदर ता पैठण येथुन दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बुधवारी दि (८ जुलै) रोजी सकाळी ९ वाजता नांदर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान ह.भ.प. अंकुश महाराज तळपे यांच्या नेतृत्वाखाली प्रस्थान झाली. यावेळी संरपंच विजय गायकवाड, उपसंरपंच आसमान काळे, माजी उपसंरपंच रेवणनाथ कर्डीले, ग्रा.पं. सदस्य यशवंत काळे, प्रविण काळे, कचरु नाचन, शिवाजी मगरे, संदीप काळे, ईश्वर कांबळे, राधाकिसन तळपे, तसेच कार्तिक सोनवणे, दत्तात्रय सोनवणे, दादासाहेब सोनवणे, देविदास सोनवणे, ह.भ.प. गोविंद तळपे, कार्तिक तळपे, यांच्यासह असंख्य भाविक उपस्थित होते.

## मंत्री विखे पाटील,आ.सुरेश धस यांनी

# लिलावती रुग्णालयात शिवराज मनोज जरांगे यांची भेट घेवून प्रकृतीची केली विचारपूस



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मुंबई येथील लिलावती रुग्णालयात उपचार घेत असलेले मराठा आंदोलनाचे नेते मनोजदादा जरांगे पाटील यांचे चिरंजीव शिवराज जरांगे यांची महाराष्ट्राचे जलसंपदा व गोदावरी-कृष्णा खोरे विकास महामंडळ मंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

यावेळी आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस, विधान परिषदेचे सदस्य मा. श्री. प्रसादजी लाड हे देखील उपस्थित होते. मान्यवरांनी शिवराज जरांगे यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिवराज यांना लवकरात लवकर पूर्णपणे बरे होण्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या कुटुंबीयांना धीर दिला. तसेच योग्य उपचार सुरू असल्याची माहिती घेत, आवश्यक त्या सर्व बाबींमध्ये सहकार्य करण्याची ग्वाहीही यावेळी देण्यात आली.आमदार सुरेश धस यांनीही शिवराज जरांगे यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस करत त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी सदिच्छा व्यक्त केली. या भेटीदरम्यान उपस्थित मान्यवरांनी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना मानसिक आधार दिला.

# दहावीत ९५% गुणांची चमक आश्लेषा इंगळेचा भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते गौरव



जालना शेख फारुक :-

अत्यंत सामान्य परिस्थितीत घरगुती मेस चालवत आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम करणाऱ्या राजू इंगळे यांच्या कष्टाला यशाची सुवर्ण किनार लाभली आहे. त्यांची कन्या कु. आश्लेषा इंगळे हिने शालांत प्रमाणपत्र दहावी परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले असून तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.आश्लेषाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी इंगळे यांच्या निवासस्थानी जाऊन तिचा भेटवस्तू पुष्पगुच्छ देऊन आणि शुभेच्छा देत विशेष सत्कार केला. यावेळी त्यांनी आश्लेषाच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक करत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. तसेच तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी माजी शहरप्रमुख बाला परदेशी, अनिल वाघमारे, ऋषींदर शिंदे यांच्यासह इंगळे कुटुंबीय उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आश्लेषाच्या गुणवत्तेचे भरभरून कौतुक करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.घरची परिस्थिती सामान्य असली तरी जिद्द, परिश्रम आणि शिक्षणावरील निष्ठा असेल तर यश निश्चित मिळते, याचा आदर्श आश्लेषा इंगळे हिने आपल्या उल्लेखनीय यशातून घालून दिला आहे.

# ॲड.गणेश समिंदर यांना अधिवक्तापदाची बहुमानाची नोंदणी बार कौन्सिलकडून ई-ओळखपत्र प्रदान

अंबड प्रतिनिधी :- तालुक्यातील मौजे सोनक पिंपळगाव येथील ड. गणेश एकनाथ समिंदर यांनी कायदा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या अधिवक्ता नोंदणीत स्थान मिळवले आहे. त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील अधिवक्ता म्हणून ओळखपत्र प्रदान करण्यात आले आहे.बार कौन्सिलने त्यांना रोल क्रमांक एमएएच/४२७४/२०२६ अंतर्गत अधिवक्ता म्हणून नोंदणी दिली असून ४ जुलै २०२६ रोजी त्यांची अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे. त्यांनी आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या बळावर वकिली व्यवसायात यशस्वी प्रवेश केला आहे.त्यांच्या या यशामुळे सोनक पिंपळगाव गावासह संपूर्ण अंबड तालुक्यात



आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. न्यायव्यवस्थेत प्रामाणिकपणे कार्य करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते महत्त्वपूर्ण योगदान देतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.ड. गणेश एकनाथ समिंदर यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नातेवाईक,मित्रपरिवार,कायदा क्षेत्रातील सहकारी आणि विविध सामाजिक स्तरांतून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

# बँकेतच ग्राहकांना हृदयविकाराचा झटका

## स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने व सीपीआर मुळे वाचले प्राण

किनवट । प्रतिनिधी । दि. १०: भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचाऱ्यांबाबत सोशल मीडियावर अनेकदा व्यंगात्मक स्वरूपाचे मिम्स व्हायरल होत असतात. मात्र देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या (डइख) किनवट शाखेतील कर्मचाऱ्यांनी आपल्या तत्परतेने आणि मानवतेच्या भावनेतून एका ग्राहकाचे प्राण वाचवत समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. दिनांक ४ जुलै २०२६ रोजी किनवट



शंकर यादव गुलाब पाटील हरीश माहूरकर

तालुक्यातील बेंदी तांडा येथील रहिवासी व स्टेट बँकेचे ग्राहक देविदास राठोड हे नियमित बँक व्यवहारासाठी किनवट येथील शाखेत आले होते. व्यवहार सुरू असतानाच त्यांना अचानक तीव्र छातीत दुखू लागले आणि काही क्षणांतच ते बँकेच्या परिसरात कोसळले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत बँकेतील कर्मचारी व भारतीय सैन्यातील सेवानिवृत्त सैनिक शंकर यादव आणि गुलाब पाटील यांनी तात्काळ धाव घेतली. सैन्यातील सेवेदरम्यान मिळालेल्या प्रशिक्षणाचा उपयोग करत त्यांनी राठोड यांना हृदयविकाराचा झटका (हार्ट अटॅक) आल्याची शक्यता ओळखली आणि कोणताही विलंब न करता त्यांच्यावर सीपीआर (उरीवळे झीश्रोपरी ठशीीलळीरींळेप) प्रक्रिया सुरू केली. योग्य वेळी दिलेल्या या प्राथमिक उपचारामुळे राठोड यांना शुद्ध येण्यास मदत झाली आणि त्यांचे प्राण वाचण्यास मोठी मदत झाली. यावेळी बँकेचे कर्मचारी हरीश माहुरकर यांनी तत्परता दाखवत रुग्णवाहिका व वैद्यकीय मदतीची व्यवस्था केली. त्यांनी राठोड यांना तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल केले. त्यानंतर त्यांच्यावर पुढील वैद्यकीय उपचार करण्यात आले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर भारतीय स्टेट बँकेच्या किनवट एसीबी शाखेचे मुख्य व्यवस्थापक सुरेश कुमार सिंग, किनवट एएमसीसी शाखेचे मुख्य व्यवस्थापक उदय कुलकर्णी, सर्व्हिसिंग मॅनेजर होमेश हटवार तसेच कॅश ऑफिसर एम. संदीप यांनी शंकर यादव, गुलाब पाटील आणि हरीश माहुरकर यांच्या प्रसंगावधान, कार्यतत्परता व मानवतावादी भूमिकेचे विशेष कौतुक केले. योग्य वेळी दाखवलेल्या धाडसामुळे एका ग्राहकाचा जीव वाचल्याने बँकेबद्दल समाजात सकारात्मक संदेश गेला असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, उपचारानंतर ८ जुलै २०२६ रोजी देविदास राठोड यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. वरिष्ठांच्या सूचनेनुसार शंकर यादव व गुलाब पाटील यांनी त्यांच्या घरी जाऊन प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी राठोड व त्यांच्या कुटुंबीयांनी वेळेवर मदत करून जीव वाचवल्याबद्दल भारतीय स्टेट बँकेच्या संपूर्ण कर्मचारीवर्ग प्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. या घटनेमुळे केवळ बँकिंग सेवा देण्यापुरतीच कर्मचाऱ्यांची भूमिका मर्यादित नसून, आपत्कालीन प्रसंगी मानवी जीवन वाचविण्यासाठी आवश्यक कौशल्य, संवेदनशीलता आणि सेवाभावही तितकाच महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित झाले

# मुखेड-कंधारच्या विकासाला वेग

## लेंन्डी प्रकल्प,३ राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आणि एमआयडीसी, रेल्वे मार्ग नकाशावर मतदारसंघ प्रगतीच्या नव्या पर्वात

देगलुर । प्रतिनिधी

मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघात विकास कामांना अभूतपूर्व गती मिळाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आमदार डॉ. तुषार राठोड यांनी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लागले असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

मतदारसंघातील तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित असलेले लेंन्डी प्रकल्प पूर्णत्वाच्या दिशेने वेगाने जात आहे. या प्रकल्पासाठी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा करून आवश्यक मंजुरी व निधी मिळवून दिला. त्यामुळे भविष्यात हजारो हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी आमदार राठोड यांनी तीन राष्ट्रीय महामार्गांची मंजुरी मिळवून दिली. आणि त्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या महामार्गांमुळे मुखेड-कंधार परिसराचा राज्यातील प्रमुख शहरांशी संपर्क अधिक सुलभ झाला असून व्यापार, उद्योग आणि वाहतूक क्षेत्राला चालना मिळत आहे.

मुखेड मतदारसंघात एमआयडीसी मंजूर करून आणि रेल्वे मार्ग नकाशावर आणणे हे त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाचे यश मानले जात आहे. या औद्योगिक वसाहतीमुळे हजारो सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

मतदारसंघातील विविध गावांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, शैक्षणिक सुविधा आणि इतर मूलभूत कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे अनेक गावांचा



चेहरा-मोहरा बदलत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत.

खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी अनेक गावांपर्यंत पक्के रस्ते मंजूर करण्यात आले असून दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

या सर्व विकास कामांमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून आमदार असावा तर डॉ. तुषार राठोड यांच्यासारखा कार्यसम्राट असावा अशा प्रतिक्रिया मतदारसंघातून व्यक्त होत आहेत.

लेंन्डी धरण,तीन राष्ट्रीय महामार्ग, एमआयडीसी आणि गावागावांतील पायाभूत सुविधा विकास कामांमुळे मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघ प्रगतीच्या नव्या पर्वात प्रवेश करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

# सिडको परिसरातील रमामाता आंबेडकर चौक येथे जड वाहनांना बंदी, लोखंडी कमान कार्यान्वित



नवीन नांदेड - सिडको परिसरातील नागरी वसाहती मधुन भरधाव जाणाऱ्या येणाऱ्या चारचाकी ट्रक टिपर सह मोठ्या जड वाहनांना माता आंबेडकर चौक ढवळे कॉर्नर येथे लोखंडी कमान बसविण्यात आल्यामुळे मोठ्या वाहनांना प्रतिबंध करण्यात आला आहे यासाठी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी या साठी सातत्याने पुढाकार घेऊन अखेर या ठिकाणी लोखंडी कमान बसविली आहे.

नांदेड ते ऊस्मानगर रोड,एम आयडीसी कॉर्नर ते माता रमामाता आंबेडकर चौक मार्ग सिडको ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावर मोठ्या प्रमाणात ट्रक टिपर डिंपर सह अनेक मोठ्या गाड्या भरधाव वेगाने ये जा करीत असत तर


सिडको भागातील वसाहतीत नागरिक युवक जेष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात जात येत असत, त्यामुळे पदाचारी व शालेय विद्यार्थी यांना जड वाहनांना मुळे दहशत निर्माण झाली होती तर संबंधित ठिकाणी लावण्यात आलेली लोखंड कमान अज्ञात वाहनाने तोडल्याने पुन्हा या भागातुन मोठ्या प्रमाणात जड वाहनाने भरधाव वेगाने धावू लागले,अखेर या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक यांनी बांधकाम विभाग व संबंधित गुत्तेदार मार्फत पुन्हा ८जुले रोजी लोखंडी कमान कार्यान्वित केली आहे. या ठिकाणी जड वाहनाना दिसण्यासाठी लालपट्टी रेडियम वापर करण्यात आला आहे.

या लोखंडी कमान मुळे परिसरातील दुचाकी,तीन चाकी,सह छोट्या चार चाकी वाहनांसह शालेय विद्यार्थी सह जेष्ठ नागरिक व युवक महिलांना दिलासा मिळाला आहे.

# बीड शहर पाणी पुरवठा योजनेचा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडून आढावा

दोषी कंत्राटदारावर कारवाईचे निर्देश

बीड(प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी अमृत-१ योजनेअंतर्गत बीड शहर पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर आढावा घेतला. योजना मंजूर होऊनही बीड शहराला अद्याप पाणी मिळत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र खंत व्यक्त केली. या योजनेची पूर्ण जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याने, कामचुकार आणि दोषी संबंधित कंत्राटदारावर नियमानुसार तातडीने योग्य ती कारवाई करावी, असे कडक निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले आहेत. आढावा बैठकीत नगरपरिषदेच्या थकबाकीचा मुद्दाही समोर आला. नगरपरिषदेची वीज बिलाची थकबाकी असल्याने महावितरणकडून वाढीव विद्युत भार मंजूर केला जात नाही, ज्यामुळे ही पाणी पुरवठा योजना सध्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊ शकलेली




नाही, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे हे प्रत्यक्ष उपस्थित होते. तर बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी ऑनलाइन पद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते.

# संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड बीड या ठिकाणी शालेय गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न : बबनराव आंधळे

बीड /प्रतिनिधी

शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड बीड या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप कार्यक्रम नगरसेवक माननीय दत्ताजी जाधव यांच्या हस्ते ठेवण्यात आला गणवेश वाटप करण्यात आले या कार्यक्रम प्रसंगी शालेय परिसरातील सामाजिक कार्यकर्ते सादेकभाई पठाण, शेख एजाजभाई, युनूसभाई तांबोळी, विलास धनवडे, शाळेतील माजी विद्यार्थी रोहन पाचंग्रे यांचे मार्गदर्शन झाले व नंतर गणवेश वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नगरसेवक दत्ताजी जाधव म्हणाले की



सर्वसाधारण कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे हा आता अवघड विषय झालेला आहे कारण इंग्लिश स्कूलचे पेव वाढवेल वाढलेले आहे त्यामुळे शिक्षण महाग झालेले आहे अशा कठीण परिस्थितीत देखील संत तुकाराम प्राथमिक शाळेने अशी उत्तुंग भरारी घेतलेली आहे त्याबद्दल शाळेचे कौतुक केले शिक्षण हेच जीवनातील यशाचे खरे साधन आहे विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवर भर न देता चांगले संस्कार सामाजिक जाणीव आणि मानवतेची भावना जर जोपासली तर आणखी चांगल्या सुधारणा विद्यार्थ्यांमध्ये होऊ शकतात यावेळी सादेक भाई बोलताना म्हणाले विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास शिस्त आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व सांगितले त्यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे आणि समाजाचे जीवन उन्नत करण्याचे आवाहन केले. शिक्षणाशिवाय आता पर्याय राहिलेला नाही शिक्षण घेतल्याने माणसातील माणूसपण जागे होते असेही ते म्हणाले या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला शालेय गणवेश मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवे प्रोत्साहन मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे अध्यक्षीय समारोप प्रसंगी त्यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जाधव सर यांनी केले या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत झाली असून समाजातील विविध घटकांनी अशा उपक्रमामध्ये पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी

व्यक्त केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बाबासाहेब आरकडे सर यांनी मानले व कार्यक्रमाचा समारोप झाला

# एस आय आर मध्ये सहभागी व्हा, लोकशाही मजबूत करा :- शेख युनूस

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात निवडणूक आयोगामार्फत सुरू असलेल्या डशिलळरश्र श्रपींशपीळींश ठशींळीळेप म्हणजे डखठ प्रक्रियेत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हा असे आव्हान सामाजिक कार्यकर्ता शेख युनूस यांनी बीड च्या जनतेला आवाहन केले आहे.



पुढे ते म्हणाले की, मतदार यादीत नाव नसल्याने अनेकांना मतदानाचा हक्क बजावता येत नाही. एस आय आर ही संधी आहे. आणि आपण सर्वांनी मिळून बीड जिल्ह्याची मतदार यादी १००% शुद्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. पुढे ते म्हणाले की, तरुणांनी, महिलांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपले नाव, पत्ता,वयाची माहिती तपासावी. काही चूक असल्यास त्वरित इजङ किंवा ींेींशीी.शलळ.सीं.

ळप या पोर्टलवर दुरुस्ती करावी. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येकाने नाव नोंदणी करणे बंधनकारक आहे. पुढे शेख युनूस यांनी नागरिकांना आव्हान केले की, आपण स्वतः सोबत कुटुंबातील आणि शेजाऱ्याची देखील नावे तपासावीत. एक जबाबदार नागरिक म्हणून ही आपली जबाबदारी आहे.

# सरकार च्या निकृष्ट कामावर बोलणारे भाड्याचे टट्टू असतील तर निकृष्ट काम करणारे गुत्तेदार तुमचे जावई आहेत का?-डॉ.जितीन वंजारे

आज-काल राजकारण एकदम खालच्या पातळीला जाऊन केलं जात आहे. महामानव विश्वरत्न बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जे पवित्र संविधान भारत देशाला दिलं यामध्ये जितकी पावर सरकारला असेल तितकीच एव्हाना त्याहूनही अधिक पावर विरोधी पक्षाला दिली गेलेली आहे. लोकशाही ही विरुद्ध पक्षावर अवलंबून असते परंतु आजकाल मिल बाटके खायेंगे अशा पद्धतीची विवरचना भारतीय राजकारणामध्ये दिसून येत आहे. जेव्हा सभागृहात बसलेले टट्टू जनहिताचे काम करत नाहीत आणि भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, बाजारीकरण वाढलं जातं तेव्हा ही लढाई सर्वसामान्यांना हातात घ्यावी लागते अशाच पद्धतीने महाराष्ट्रामध्येच नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये जो सध्याच्या चालू सरकारचा फुसका विकास चालू आहे विकासाच्या नावाखाली नंगानाच चालू आहे, उद्घाटनापूर्वीच फुले पडत आहेत, उद्घाटन झाल्यानंतर दोन-चार दिवसात ते उध्वस्त होत आहेत, निकृष्ट दर्जाची कामे केली जात आहेत, कॉन्ट्रॅक्ट जवळच्या माणसाला देऊन आदानी अंबानीसारख्यांच्या उद्योगपतींच्या घशामध्ये संपूर्ण देश घातला जातोय मग मी एक सामान्य माणूस म्हणून असा प्रश्न पडतो की तुमच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे त्याच्या विरोधात बोलल्यावर तुम्ही डायरेक्ट त्यांना भाड्याचे टुटू म्हणतात तर तुम्ही सरकार चालवता एक रुपया मध्ये एक एकर जमीन अदानी आंबानीला देता तर तुम्ही पण येथील आदानी अंबानीचे भाड्याचे टट्टू आहात का? यावरून हे सिद्ध झालं आहे आणि खरं बोलणारे जर भाड्याचे टट्टू असतील तर निकृष्ट दर्जाचे काम करणारे गुत्तेदार तुमचे लाडके जावई आहेत का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापुरीकर यांनी केला आहे.

सभागृहामध्ये बोलत असताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्र फडणवीस यांनी निकृष्ट काम केलेल्या मिसिंग लिंक वर टीका टिप्पणी करणाऱ्या सामान्य लोकांना भाड्याचे टट्टू असे म्हटले गेले कायदेशीर कार्यवाही करू अशी धमकी दिली महाराष्ट्र हा पुरोगामी राष्ट्र आहे. देशाचा तर नंगा नाच केलाच आहे परंतु महाराष्ट्राचा नंगानाच होऊ दिला जाणार नाही. तुम्ही सरकारमध्ये बसले आहात तुम्ही कोणाची तरी गुलाम आणि टट्टू असू शकता येथील जनतेने हजारो वर्षापासून अनेक राजे महाराजे तुमच्यासारखे सीएम,पीएम



आमदार,खासदार, मंत्री संत्री पाहिले आहेत परंतु निकृष्ट काम केल्यावर त्याची वाहवा करून त्यांची पाठराखण करणारा तुमच्यासारखा धमक्या देणारा सीएम आज पर्यंत आम्ही पाहिला नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचा आणि त्यांनी दिलेल्या धमकीचा मी जाहीर निषेध करतो असे प्रतिपादन डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी केले. केंद्र सरकारच्या विरोधात बोलल्यावर तो देशद्रोही ग्राह्य केला जातो, राज्याच्या बाबतीत बोलल्यानंतर तो भाड्याचे टट्टू म्हणून ग्राह्य धरले जाते,हम करे सो कायदा अशा हुकुमशाहीच्या राज्यात आम्ही राहतो की काय? असा प्रश्न आम्हाला पडत आहे राम मंदिर चोरीवर हे बोलत नाहीत, निकृष्ट दर्जाचे कामावर बोलत नाहीत,मिसिंग लिंक तीन महिन्यातच पडली बोलत नाहीत,नांदेड येथील पूल कोसळला बोलत नाहीत, मोठमोठ्यांची अतिक्रमण ह्यावर बोलत नाहीत,शिक्षणात होणारे बाजारीकरण, बंद होणाऱ्या मराठी शाळा यावर यांचं तोंड उघडत नाही,शिक्षणाचे बाजरीकरण केलं महागाई प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. शेतकऱ्यांना खते बी बियाणे निकृष्ट दर्जाचे मिळत आहेत.नाले,सांडपाणी,रस्त्याचे व्यवस्थापन ठीक नाहीये , हजारो करोड रुपये खर्चून केलेले रस्ते दोन महिनेही टिकत नाहीत, जिथे तिथे भ्रष्टाचार मारामारी अत्याचार अन्याय जातिवाद आणि धर्मवाद महाराष्ट्रामध्ये वाढलेला असताना सत्ता नसताना शेतकऱ्यांचा सातबारा तीन वेळा कोरा करणारा याच महाराष्ट्राचा सीएम सत्तेत आल्यावर आज पर्यंत शेतकरी कर्जमाफी करत नाही या आणि अशा अनेक प्रश्नांवर यांचे तोंड उघडत नाही परंतु निकृष्ट दर्जाचे काम केल्यावर सामान्य माणसाने उठवलेला आवाज यांचा महाराष्ट्र बदनाम करतो त्यांना मी सांगू इच्छितो, फडणवीस साहेब बदनाम तुम्ही आहेत माझा महाराष्ट्र अख्या देशाला आणि जगाला पुरून उरेल इतका समृद्ध आहे माझा महाराष्ट्र बदनाम कधीच होऊ शकत नाही, तुमच्यासारख्या लोकांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळेच तो बदनाम होत आहे आणि म्हणून सामाजिक कार्यकर्त्यांना बोलावं लागतं आणि ते जर सहन होत नाही तर निकृष्ट दर्जाचे काम केल्याबद्दल यव्हाना तुमच्याकडून ते घडल्याबद्दल नैतिकतेने तुम्ही राजीनामा द्यावा